मासिक
# हिंदुबोध
वर्ष – सोळावे : अंक ९
शके १९३८
फेब्रुवारी २०१७

संपादक
श्री. विवेक सिन्नरकर
९३७१००३७४८,
(०२०) २५३८४७८८
sinnarkarvivek@yahoo.com
निवास : १६,रामार्पण,
गणंजय सोसायटी, युनिट १,
कोथरूड, पुणे – ४११ ०३८.

अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध.

卐 संपादक मंडळ सदस्य 卐
श्री. बाबूजी नाटेकर,
श्री. उमेश भोसले

卐 पत्रव्यवहार 卐
द्वारा : संपादक, 'हिंदूबोध',
विश्व हिंदू परिषद कार्यालय
१३६०, शुक्रवार पेठ,
भारतभवन, नातूबाग,
पुणे – ४११ ००२.
दूरभाष : २४४७ १७ ०१

अंकमूल्य रु. १०/–
वार्षिक वर्गणी रु. १००/–
पंचवार्षिक वर्गणी रु. ४००/–
दशवार्षिक वर्गणी रु. ७५०/–
आजीवन वर्गणी रु. १५००/–
(२० वर्षे)
(शक्यतो आजीवन वर्गणी द्यावी)

卐 मुद्रण स्थळ 卐
संवाद ट्रेडप्रिंटस्
५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.
दूरभाष : २४४८५६३२.
sanwadpvt@gmail.com

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतातच असे नाही.
(केवळ व्यक्तिगत उपयोगासाठी)

ॐ

## धवल यशाचे पाईक आम्ही प्राण पणाला लावू

ॐ

धवल यशाचे पाईक आम्ही प्राण पणाला लावू
कीर्ति यश:श्री आणू खेचुन समाजचरणी वाहू ।। धृ।।

या मातेच्या भालावरती हिमरत्नांचा किरीट
या जननीचे चरण क्षाळते महासिंधुची लाट
चंद्रसूर्यही किरणजलाने रोज घालती न्हाऊ ।। १।।

या जननीच्या उदरी येती सजीव उज्ज्वल रत्ने
दृढव्रती ते पुत्र आणती सुरगंगेला यत्ने
याच भूमिला फुलवित हसवित नद्या लागती वाहू ।। २।।

कृतान्त आम्ही सहज नाशिले दैत्य मदोन्मत्त
सहज सुकोमल भाव फुलविले दगडाधोंड्यात
जगतामध्ये कल्पतरूंचे सुंदर उपवन फुलवू ।। ३।।

पराभवाचे जहर पचविले नीलकंठ आम्ही
युगायुगाचे दुर्जन हरले धरतीचे स्वामी
देवद्वेष्टे आम्ही हरविले आम्ही वीरबाहू ।। ४।।

जगतामध्ये सौख्य नांदवू हीच प्रतिज्ञा मनी
अणुरेणूही निर्मल व्हावा आकांक्षा जीवनी
अशुभ जळावे शुभ नांदावे ह्यास्तव जीवन घडवू ।। ५।।

卐 卐 卐

## अनुक्रमणिका

• 'समर्थ भारत' चा जागर
श्री. विवेक सिन्नरकर ............... ५
• समर्थ भारत जागर
उपक्रमाची माहिती ............ ८–२०
• वि.हिं.प. पश्चिम महाराष्ट्र
प्रांत बैठक वृत्त .................... २१
• रामायणातील काही
आदर्श व्यक्तिमत्वे (क्रमश:२) .. २३
• उपवास, पूजा यांचे यर्थाथ स्वरूप
पुरूषोत्तम गिरी ..................... २४
• पंचांग व दिनविशेष ................ २६

HINDUBODH - RNI No. MAHMAR/2001/5879 हे 'हिंदूबोध' मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक विवेक प्रभाकर सिन्नरकर यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ,पुणे ३० येथे छापून, १३६० शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे – २ येथे प्रकाशित केले.
संपादक : विवेक प्रभाकर सिन्नरकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)


ASHIDA
उपयुक्तता - खालील गोष्टींसाठी उपयुक्त उपकरण
१. भू-जल आणि बोअरवेल यांची जागा शोधण्यासाठी.
२. क्षारयुक्त शेतजमीन - भराव - मलनिस्सारण वाहिनी यांचा शोध घेण्यासाठी.
३. वाहिन्या गंजू नयेत यासाठी परिक्षण.
४. भूगर्भीय दोषांचा शोध घेणे.
५. पॉवर सबस्टेशनचे अर्थिंग करणारे रॉड तपासण्यासाठी.
SOIL RESISTIVITY METER
ASHIDA
Ashida Electronics Pvt. Ltd.
Ashida House, Plot No. A-308, Road No. – 21,
Wagle Industrial Estate, Thane – 400604, India.
Tel : 022 – 61299124 / 25
Fax : +91 – 22 – 25804262
Email : sales@ashidaelectronics.com
Web : www.ashidaelectronics.com
जमिनी खालील पाणी व स्तरांचा शोध



# 'समर्थ भारत' चा जागर

संपादकीय ....

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची १९२५ ला स्थापना करून डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी 'समर्थ भारता' चे एक दिव्य स्वप्न देशाला दिले. समर्थ भारत हे केवळ स्वप्न नाही तर एक असे आव्हान आहे, की ज्याच्या पाठपुराव्यासाठी संघ गेली ९० वर्षे संघस्वयंसेवकांच्या एका शिस्तबद्ध संघटनेचा जागर करीत आहे.

**या निशा सर्वभूतानाम् तस्याम् जागर्ती संयमी। यस्यां जाग्रती भूतानी सा निशा पश्यतो मुनेः ।। ६९।। भ. गीता.** संपूर्ण समाज जेव्हा आत्मग्लानीमध्ये गुंतून कधी डोक्यावर पांघरूण घेवून सामाजिक प्रश्नापासून पळण्यात धन्यता मानत असतो, त्या वेळी समाजातील उपेक्षित, गरजु व दुर्बलांच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सुखमय जीवनाकडे पाठ करून, करुणेची नाव वल्हवत वल्हवत ''**बुडत्या जनांना**'' आधार देण्याचे ''**समर्थ**'' कार्य करणारे **संयमी स्वयंसेवक** संघाने घडविले.

१९४० ते ७० पर्यंत च्या दशकात श्री गोळवलकर गुरुजींच्या नेतृत्वाखाली संघ देशभरात पोहोचला होता. हिन्दू राष्ट्रवादाचे चिंतन हे राष्ट्रीय पटलावर रुजण्याचे कार्य संघाने केले. देशाने एक स्वतंत्र तत्वज्ञान म्हणून संघाचे राष्ट्रचिंतनाचे विचार स्विकारले. संघ विचाराचे कार्यकर्ते घटनात्मक चौकटीतून लोकसभेपर्यंत पोहोचले. गांधी हत्येनंतरच्या होरपळीत अनेक संघ परिवार मातीला मिळाले होते तरी संघ विचाराची मूठ हळूहळू 'वज्रमूठ' होवून त्या निखळ संघटनेच्या वज्रमुठेने बेगडी समाजवादाच्या आणि हिंस्त्र साम्यवादाच्या भींती व बुरुज ढासळले.

भारतीय मूल्यांची पुनर्स्थापना करण्यास संघ परिवाराचा विस्तार ''विश्व हिंदू परिषद'', ''भारतीय मजदूर संघ'', ''जनसंघ'',''वनवासी कल्याण आश्रम'' यांच्या माध्यमांतून झाला. उपेक्षित व विखुरलेले हिन्दू. ''**न हिन्दू पतितो भवेत**'' म्हणत विश्व हिंदू परिषदेच्या गरुडपंखाखाली एकत्र झाले. जातपात विरहित हिंदू संघटित होवू लागले. वनवासी पददलीत मिशनरींच्या विळख्यातून सुटून पुन्हा राष्ट्रीय प्रवाहात संघटित होण्यासाठी वनवासी कल्याण आश्रमाद्वारे शेती, शिक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण होवू लागले. धर्मांतरणे व राष्ट्रांतरणाचे दुष्टचक्र रोखले गेले. साम्यवादी कामगार संघटना धोरणातून दहशत,संप आणि उद्योग विरोधी धोरणांतून कामगारांची सत्ता आणण्याचे स्वप्न दाखवून, देशाला औद्योगिकीकरणापासून वंचित ठवत. भारतीयत्व, राष्ट्रीयत्व तत्त्वांना सुरुंग लावून कामगार विश्वाला असंतोषाची व हिंसेची हवा दाखवून देशात सामाजिक व राजकीय अस्थिरता कायम ठेवण्याचे आंतराष्ट्रीय षडयंत्र यशस्वी करु पहात होते. त्यावेळी कामगार हिताशी राष्ट्रीय विधायक विकासाला जोडून,कामगार विश्वात स्थैर्य आणण्याचे यशस्वी कार्य ''**भारतीय मजदूर संघ**'' या संघप्रणित कामगार संघटनेने केले व अराजकतेच्या वणव्यापासून कामगार वर्गाला वाचविले. बनावट सर्वधर्मसमभावाच्या चलनाने अल्पसंख्यकांना कधी बहुसंख्याक हिंदूंची भीती दाखवून, तर कधी इतिहासांचे पुनर्लेखन करून,ब्रिटिश मॅकेलेच्या शिक्षणपद्धतीपेक्षाही घातक शिक्षणपद्धती निर्माण करून काँग्रेसने पुरोगामी व प्रतिगामी ही राजकीय सोयीची उभी दुफळी, गावागावात माजविली. बहुसंख्यांक

हिन्दूंच्या अस्मिता कायम पायदळी तुडवल्या. भ्रष्टाचाराला राजशिष्टाचाराचे मुकुट चढवून त्याला सिंहासन दिले. धर्मनिरपेक्षता नावाखाली हिन्दू पंथांना अल्पसंख्य धर्मांचा दर्जा देवून, हिन्दू ऐक्याला सुरुंग लावण्याचे पाप काँग्रेसने केले. म. गांधीजींचा वारसा सांगून भ्रष्टाचार व दहशती व्दारे लोकशाहीला सत्तेची बटीक बनवून निवडणुकांच्या बाजारात उभे केले. स्वच्छ व पारदर्शक राजकारण करणारे संन्यस्त विचाराच्या संघ कार्यकर्त्यांच्या बलावर 'जनसंघ' स्थापन करून काँग्रेस,साम्यवाद्यांच्या अभद्र युतीला उघडे पाडले. फुटिरतावादाला,संघर्षाला विरोध करण्यासाठी जीव ओवाळून टाकणारे राजकीय नेतृत्व संघाने दिले.

समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी संघाचे अनामिक हजारो प्रचारक जीवनाचा होम करून गेली ९० वर्षे संघ विस्तार करण्यात गुंतले आहेत. १९७० च्या दशकात श्री गुरुजींच्या पश्चात मा. श्री. **देवरसांच्या** नेतृत्वखाली संघाने राजकीय सामाजिक पाया पक्का करीत सामान्य कार्यकर्त्यांना सेवा प्रकल्पांमध्ये कार्यशील केले. समरसता मंचाद्वारे उपेक्षितांचे अंतरंगात शिरून व हिन्दू जनजातींना एका व्यासपीठावर आणून, सामाजिक सन्मान व समता, जागरुकता आणली. संघ परिवारालाच 'अस्पृश्य' ठेवण्याचे राजकारण करून संघ विचारांना रोखण्याचे अयशस्वी प्रयत्न करण्यासाठी डाव्या विचारवंतांची व डाव्या राजकीय पक्षांची राजकीय व धार्मिक ध्रुवीकरण करण्याची व्यर्थ धडपड गेली ३० वर्षे देशाने पाहिली.

संघाने मात्र आपले ''**समर्थ भारता**''चे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून व विरोधी प्रवाहांवर मात करीत देशाच्या अस्पर्श भागांत विविध सेवा कार्ये उभी केली. स्वा. विवेकानंद केंद्राद्वारे पूर्वांचल मधील भारतीयांना राष्ट्रीय प्रवाहात आणले. त्यांना  शिक्षण, व्यवसायाच्या संधी देताना व अनेक युवक युवतींना महाराष्ट्रात शिक्षणासाठी बोलावून देशाशी जोडले. धर्मांतराला आळा घातला. विहिप, संघपरिवाराने मुस्लिम दहशतवाद, लव्ह जिहाद, श्रीरामजन्मभूमी, श्रीकृष्ण जन्मभूमी, श्रीकाशी विश्वनाथ मंदिर मुक्तिचा आंदोलनात्मक, जनजागणात्मक व कायदेशीर लढा १९८५ मे २०११ पर्यंत यशस्वी लढवून, श्रीरामजन्मभूमीचा लढा निर्णायक टप्प्यावर आणला. श्रीरामजन्मभूमी कायद्याने श्रीरामांची झाली. त्यातून ''**गर्व से कहो हम हिंदू है।**'' हा अभिमान देशातील घरोघरी रुजला. बजरंगदल कार्यकर्त्यांनी गोरक्षण करून जागृती आणली. तर दुर्गा वाहिनी द्वारे युवतींचे सक्षमीकरण झाले.

संघ परिवारामध्ये गेली ३० वर्षांत अनेक सेवाप्रकल्प व न्यास स्थापन करून खेडोपाडी आश्रमशाळा, शिक्षणसंस्था, व्यवसाय प्रशिक्षण संस्था, बालसंस्कार वर्ग, महिला सक्षमीकरण, दुर्ग संवर्धन, अनाथालये, अनाथ महिला सक्षमीकरण, वनवासी विद्यार्थी आश्रमशाळा, गोरक्षण, गोवंश विज्ञान प्रकल्प, शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग, जलसंधारण, कृषी प्रशिक्षण, भटके विमुक्तांच्या बालकांना शिक्षण वगैरे शेकडो संस्था संघ प्रेरणेने सुरु झाल्या आहेत व यशस्वी झाल्या आहेत. आज अशा संस्था नावारुपास येत आहेत. संघ स्वयंसेवक तन मन धनाने या प्रकल्पांसाठी झटत आहेत. आज असे आपण गौरवाने म्हणून शकतो की देशात सर्वांत जास्त सेवाकार्ये संघ परिवाराद्वारे यशस्वीपणे चालवली जातात. ख्रिश्चन मिशनरी पेक्षाही जास्त सेवाकार्ये संघ उबी करत आहेत. ते ही केवळ स्वदेशी आर्थिक मदतीवर! परदेशी मदतीवर चालणाऱ्या बहुतेक प्रकल्पांची उद्दिष्ट्ये संशयास्पद व देशविरोधी असल्याचे दिसत असताना, भारताला समर्थ करणारी स्वदेशी सेवाकार्ये संघ उभी करीत आहे. प्रश्न निर्माण करण्यांपेक्षा, देशातील सामाजिक,

राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक प्रश्नांची उत्तरे स्वयंप्रेरणेने शोधणारे **'कर्मयोगी कार्यकर्ते'** घडविण्याचे कार्य संघ करीत आहे.

**''शिवशक्ती संगम''** या प. महाराष्ट्राच्या संघ स्वयंसेवकांच्या गाजलेल्या सुपरिचित सांघिकात महाराष्ट्रातून दिड लाख जुन्या नव्या संघ स्वयंसेवकांनी नाव नोंदणी केली. त्या एक दिवसीय सांघिकामध्ये शिव म्हणजे मंगलमय व विधायक कार्यात शक्तिचा संगम घडवण्याचे आवाहन मा. सरसंघचालक पू. श्री. मोहनजी भागवत यांनी केले. संघशक्तिचा उदय हा एक गेल्या ९० वर्षांतील देशाला परम वैभवापर्यंत नेण्याचा 'सिद्ध मंत्र' आता सर्वमान्य झाला आहे. संघ माध्यमातून देशसेवा करण्यास जुन्याबरोबर नवी पिढीही उत्सुक आहे. संघाची ही शतकाकडे वाटचाल देश व जग उत्सुकतेने व आशेने पहात आहे.

केवळ पुण्यातून ४५००० संघ कार्यकर्त्यांनी नोंद केली. त्यापैकी बहुतांश संघकार्यकर्ते शिवशक्ति संगमाला उपस्थित होतेच. उर्वरितांनी हितचिंतक म्हणून अन्य सेवांमध्येही भाग घेतला. ४५००० स्वयंसेवकांचे परिवार, मित्र, सहकारी अशा केवळ, संघकार्यास उत्सुक स्त्रीपुरुष नागरिकांची व विविध संस्थांची संख्या दोन लाखांवर जाते. त्यांच्यापर्यंत आपल्याला संपर्क साधायचा आहे. त्यांना विविध सेवाकार्यांना जोडायचे आहे.

अशा संस्था व संघ स्वयंसेवक  हे दैनिक संघ कार्यात तर काहीजण सेवा प्रकल्पात सहभागी होवू इच्छितात. तर काही संस्थांना अशा **'आहे रे'** वर्गातील कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे. याचा अभ्यास करून शिवशक्ति संगम कार्यक्रमाचे वर्ष- पूर्तीच्या निमित्ताने अशा संस्था व कार्यकर्ते यांचा संगम घडवून, त्यांची ऐच्छिक जोडणी करण्यासाठी पुणे महानगर स्तरावर **'समर्थ भारत'** ही संकल्पना उदयाला आली आहे. त्याद्वारे गेली २/४ महिने इच्छुक कार्यकर्त्यांची नोंदणी चालू आहे.

येत्या ५ मार्च २०१७ ला अशा शेकडो संस्था व हजारो कार्यकर्ते यांचा एकत्रित मेळावा पुण्यात ठरला आहे. २१ व्या शतकातील संघ व भारत यांचे सामर्थ्य परस्परांवर अवलंबून रहाणार आहे. याचा संगाला विश्वास आहे. **अखंड भारत, समर्थ भारत, विश्वगुरु भारत, वैभवसंपन्न भारत, स्वयंपूर्ण भारत, महाशक्ती भारत ही वेगवेगळी नामकरणे केली,तरी त्या सर्वांचा उद्देश व ध्येय वा स्वप्न एकच आहे. ते म्हणजे भारताचा सर्वांगिण विकास. पुण्याचा हा 'समर्थ भारत' प्रकल्प अन्य महानगरांना व प्रांताना, पर्यायाने देशालाही 'पथदर्शी' ठरावा ही अपेक्षा आहे.**

त्या प्रकल्पाची सविस्तर माहिती या अंकात देत आहोत. आपण व आपले कुटुंबीय, मित्र परिवार यांची सेवा कार्यकर्ता म्हणून आपण नोंदणी **'समर्थ भारत'** साठी करावी. आपापल्या नगरात असा प्रकल्प सुरु करावा.त्यातूनच देश व कार्यकर्ता समर्थ होणार आहे. **''समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळी कोण आहे?** ''या समर्थ रामदासांच्या विश्वासाला पात्र होऊन  आपण भारताचे **''आनंदवनभुवन ''** करण्यासाठी एकत्र येवू. आपला वेळ, श्रम, धन, बुद्धि, शक्ति यांचे दान देशसेवेसाठी देवून जीवन सर्थकी लावूया. आपल्याला आवडेल ते कार्य निवडून, त्यासाठी 'यथाशक्ती' नाही तर, 'पूर्ण झोकून देवून' संघ सेवा कार्यात सहभागी व्हावे. करा **'समर्थ भारत'** चा जागर स्वामी विवेकानंद म्हणत, **''युवकांनो,गंजून मरण्यापेक्षा झिजून मरणे श्रेयस्कर! ''**

**(sinnarkarvivek@yahoo.com)** 卐 卐 卐 **विवेक प्र. सिन्नरकर**

# ‘समर्थ भारत’ जागर

आपण सारे समाजाविषयी आणि समाजातील समस्यांविषयी संवेदना बाळगणारे समाजाचे जागरूक घटक आहोत. आपल्या देशाला सशक्त, समृद्ध आणि संपन्न करण्यासाठी आपण सारे कटिबद्ध आहोत; परंतु या देशातील बेकारी, व्यसनाधिनता, अनारोग्य, निरक्षरता, गरिबी, सामाजिक असुरक्षितता, भ्रष्टाचार यांसारख्या अनेकानेक समस्यांनी ग्रासलेला आपला देश खरोखरच जगाचे नेतृत्व करू शकेल का? जोपर्यंत येथील प्रत्येक नागरिक सुखी, समृद्ध आणि देशभक्त होणार नाही, तोपर्यंत आपण आपल्या देशाचे भविष्य उज्वल करू शकणार नाही, हे आपण सारेच जण जाणतो. आपल्या देशाचा भविष्यकाळ सामर्थ्यशाली करायचा असेल, तर आपल्याला आपला परिसर, आपले गाव, आपले शहर या ठिकाणच्या समस्यांचा विचार करून, या सर्व समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. आणि नेमके हेच काम ‘समर्थ भारत’ म्हणून आपण करणार आहोत. आपल्या पुणे महानगरातील विविध समस्या सोडविण्यासाठी आपली आवड, वेळ आणि कौशल्य यांचा उपयोग करून येथील सामाजिक कार्यात आपल्याला स्वत:ला जोडून घ्यायचे आहे.

‘समर्थ भारत’ नोंदणीच्या निमित्ताने स्वयंसेवक आपल्याकडे येतील, सामाजिक कार्य करण्यासंदर्भात चर्चा करतील; तेव्हा पुणे शहरातील सामाजिक संस्थांची निवड करणे, आपणास सोपे जावे; म्हणून ही पुस्तिका प्रकाशित करीत आहोत. समाजातील समस्या आणि त्याला उत्तर म्हणून चालणारी सामाजिक कामे यांचे प्रमाण पाहता या पुस्तिकेतील माहिती त्रोटक वाटेल; परंतु आपल्या सर्वांना कोणतेतरी एक सामाजिक काम स्वीकारण्यास मदत व्हावी, एवढाच मात्र एक हेतू या पुस्तिकेचा आहे. आपणास विनंती आहे की, आपण रविवार, दि. ५ मार्च २०१७ रोजी जेव्हा ‘समर्थ भारत’ एकत्रीकरणास प्रत्यक्ष भेटू.

**संघ रचनेतील कामे : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जागरण श्रेणीमध्ये संपर्क, सेवा, प्रचार आणि गतिविधींमध्ये समरसता, गो-सेवा, कुटुंब प्रबोधन, धर्मजागरण, ग्रामविकास यासाठी ज्या स्वयंसेवकांना काम करायचे आहे, त्यांच्यासाठी या सर्व विभागांची थोडक्यात ओळख देत आहोत.**

**जागरण श्रेणी :**

**संपर्क :** समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांना संघ विचारांशी जोडून, त्यांच्या कर्तृत्वाचा उपयोग राष्ट्रीय विचार दृढ करण्यासाठी संपर्क विभाग कार्यरत आहे. त्यासाठी एकत्रीकरण, सहल, प्रकल्प भेट अशा उपक्रमांबरोबरच परिसरातील प्रभावशाली मान्यवर व्यक्ती, संस्था, विविध मंडळे यांच्याशी संपर्क ठेवणे, वस्तीतील विविध पुरस्कारप्राप्त व्यक्ती, खेळाडू, कलाकार, विद्यार्थी यांना भेटणे, इ. कामांचा समावेश संपर्क विभागात होतो.

**सेवा :** यात संघ स्वयंसेवकांमध्ये व समाजामध्ये सेवाभाव निर्माण व्हावा, यासाठी विविध सेवा उपक्रमांद्वारे प्रयत्न करणे अपेक्षित आहे. तसेच, छोटीमोठी सेवाकार्ये सुरू करणे, समाजात सेवाकार्य करणाऱ्या संस्थांशी संपर्क करणे व त्यांच्या सेवाकार्याला प्रोत्साहन व भेटी देणे इ. कामे केली जातात. उदा., रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, जनजागृती, संस्कारकेंद्र, अभ्यासिका इ.

**प्रचार :** राष्ट्रीय विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम प्रचार विभागात केले जाते. यामध्ये साप्ताहिके, मासिके, जागरण पत्रिका इ.चा प्रसार करणे; वर्गणीदार वाढविणे; विविध माध्यम प्रतिनिधींशी संपर्क ठेवणे; सोशल मीडिया, प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया इ. विविध माध्यमांचा प्रभावी वापर करण्याचे प्रशिक्षण देणे; (यामध्ये पत्रलेखन, ब्लॉग इ. बरोबरच वस्तीमध्ये फलकलेखन यासारख्या प्रचार साहित्याचा उपयोग) याचा समावेश आहे.

**गतिविधी : समरसता :** समाजातील विविध घटकांमध्ये परस्पर स्नेह वाढावा व समरसता निर्माण व्हावी, यासाठी विविध कार्यक्रम व उपक्रमांची योजना या विभागांतर्गत केली जाते. समाजातील महापुरुषांच्या विचारांना सर्वदूर पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जातात. यामध्ये महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथींचे कार्यक्रम, सभा, संमेलने इ. विविध जातीप्रमुखांशी संपर्क व त्यांचे एकत्रीकरण इ. कार्यक्रम केले जातात.

**गो-सेवा :** गाय हे भारतीयांचे केवळ श्रद्धास्थान नाही, तर येथील शेतीव्यवसायाचा आधार राहिला आहे. गायीचे संगोपन, संरक्षण यासाठी विज्ञानाधारित गो-सेवा कार्य केले जाते. यामध्ये भारतीय गो-वंश संवर्धन, सेंद्रिय खत, विविध गो-उत्पादन निर्मिती, प्रचार-प्रसार, विक्री व प्रबोधन इ. कामे केली जातात.

**कुटुंब प्रबोधन :** भारतीय कुटुंबव्यवस्था आपल्या संस्कृतीचा व समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. आपली चिरंतन मूल्ये जोपासत, कुटुंबांचे काळानुरूप प्रबोधन करण्याचे कार्य या विभागाद्वारे केले जाते. यामध्ये कुटुंबातील सर्व घटकांसाठी संस्कारक्षम विविध कार्यक्रम, उपक्रम यांची योजना केली जाते. यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकत्रीकरण, त्यांच्यासाठी संस्कारक्षम कार्यक्रम, प्रशिक्षण, प्रबोधन घेतले जाते.

**धर्मजागरण :** हिंदू समाज या देशाचा आधार आहे. श्रद्धाजागरणाद्वारे या देशाची संस्कृती व राष्ट्रीयत्व अबाधित ठेवण्याचे कार्य या विभागाद्वारे केले जाते. यामध्ये श्रद्धाजागरणासोबतच हिंदू समाजातील सर्व घटकांना परस्परांशी जोडून ठेवण्यासाठी व सक्षम करण्यासाठी कार्य केले जाते. वस्तीमध्ये आरतीकेंद्र चालविणे, प्रभावी संत-संप्रदायांशी संपर्क ठेवणे, धर्मांतर थांबवणे इ. कामे केली जातात.

**ग्रामविकास :** गाव हे भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक कार्याचे केंद्र राहिले आहे. गावांचा विकास झाला; तरच भारताचा विकास होईल. यादृष्टीने ग्रामविकास विभागांतर्गत गावाच्या विकासासाठी कार्य केले जाते. यामध्ये गावांतील आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन, शेतीविकास इ. साठी प्रयत्न केले जातात. शहरामध्ये 'मेरा गाव-मेरा तीर्थ' यासारखे उपक्रम, तसेच ग्रामविकासात काम करणाऱ्या संस्थांसाठीचे अभ्यासगट उभे केले जातात. ***

---

**सेवासंस्था व सेवाप्रकल्प : या विभागामध्ये 'शिक्षण' हे क्षेत्र घेऊन काम करणाऱ्या निवडक संस्थांची माहिती देत आहोत. शिक्षणाबरोबरच स्पर्धापरीक्षा केंद्र, प्रौढ साक्षरता वर्ग, विशेष मुलांचे शिक्षण इ. विविध विषयांवर काम करणाऱ्या संस्थांची माहिती संकलित केली आहे. कुणीही शिक्षणापासून वंचित राहू नये, सर्वांनी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे हा मुख्य उद्देश ठेवून या सर्व संस्था काम करीत आहेत.**

---

**अक्षरभारती :** २००७पासून अक्षरभारती संस्थेद्वारे मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. दुर्गम भागांमध्ये 'ग्रंथालये' स्थापन करणे, विविध वसतिगृहांतून 'वाचनालयां'ची निर्मिती करणे; त्याचबरोबर लेखनशैली सुधारणे, गट अभ्यास, चित्रकला, इंग्रजी शिक्षण, संगणक शिक्षण, क्रीडा, कला यांसारख्या विविध उपक्रमांबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**क्रीडाभारती :** खेळ व खेळाडू यांना समर्पित असलेली क्रीडाभारती संस्था १९९२ मध्ये स्थापन करण्यात आली. खेळांच्या माध्यमातून चारित्र्यवान राष्ट्र निर्माण करणे या उद्देशाने संस्था कार्यरत आहे. महाराष्ट्राच्या कार्यविस्तारानंतर संस्था २००९ पासून अखिल भारतीय पातळीवर काम करीत आहे.

**तोरणा राजगड समाजोन्नती न्यास :** सन १९८६ साली ग्रामीण भागाचा विकास साधण्याच्या हेतूने वेल्हे परिसरातील अतिदुर्गम भागात सदर संस्थेची स्थापना झाली. शिक्षण-ग्रामविकास-ग्रामआरोग्य-ग्रामरक्षण या चतु:सूत्रीच्या आधारवर संस्थेचे काम सुरू आहे. या परिसरातील गरीब,

अनाथ विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची स्थापना केली आहे. विद्यार्थ्यांबरोबरच मुलींसाठीसुद्धा घरापासून शाळेपर्यंत मोफत वाहन व्यवस्था सुरू केली आहे, त्यामुळे दुर्गम भागातील मुलींच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे.

**दुर्गादेवी चॅरिटेबल ट्रस्ट** : दुर्गादेवी चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना २००२ साली रेंजहिल, शिवाजीनगर, पुणे येथे दुर्गम भागातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी झाली. दुर्गम भागातील विद्यार्थी/विद्यार्थिनींना इ.७वीच्या पुढे शिष्यवृत्ती दिली जाते. ज्या शाळांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव आहे, अशा शाळांना त्या पुरवण्याचे कामही संस्थेमार्फत केले जाते.

**नारायण गुरू अभ्यासिका** : सन १९९५ साली सेवावस्तीतील मुलांना अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी, तसेच चांगले संस्कार व्हावेत, या उद्देशाने अभ्यासिकेची स्थापना करण्यात आली. आज २१ वर्षे सातत्याने अनेक मुले-मुली या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत. या अभ्यासिकेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज उत्तम प्रकारे अर्थाजन करीत आहेत. अभ्यासिकेमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी 'विवेकानंद संचयनी' सुरू आहे. या माध्यमातून गरजूंना आर्थिक मदत, शैक्षणिक मदत, कर्जवाटप केले जाते.

**भारतमाता अभ्यासिका** : 'सावरकर मंडळा'च्या माध्यमातून १९८५पासून ही अभ्यासिका पुण्यात पर्वती पायथ्याजवळ सुरू आहे. विशेषत: सेवावस्तीतील मुला-मुलींना घरातील कमी जागेमुळे अभ्यासासाठी होणारी अडचण लक्षात घेऊन, संस्थेने अशा मुला-मुलींना मोफत जागा उपलब्ध करून दिली आहे. या जागेत सायंकाळी ५ ते रात्री ११या वेळेत विद्यार्थी अभ्यास करतात.

**विद्याभारती** : 'विद्याभारती'च्या वतीने देशभरात प्राथमिक, पूर्व प्राथमिक, माध्यमिक व वरिष्ठ विद्यालयांची संख्या दहा हजारांच्यावर आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक, योग, संगीत, संस्कृत, नैतिक व अध्यात्मिक शिक्षण, शिशुवाटिका, वैदिक गणित अशा विषयांसाठी अखिल भारतीय पातळीवर कार्य केले जाते.

**विज्ञान भारती** : सन १९९१ साली विज्ञान भारतीची स्थापना करण्यात आली. विज्ञान आणि तंत्रज्ञानांच्या आधाराने भारताचा सर्वांगीण विकास साधण्याचा संकल्प करून संस्था २० वर्षांपासून कार्यरत आहे. यात अनेकविध मान्यवर शास्त्रज्ञ आणि वैज्ञानिकांचा सहभाग आहे. प्राचीन व आधुनिक विज्ञान यांची शास्त्रशुद्ध सांगड घालत स्वदेशीच्या तत्त्वांशी समन्वय साधण्याचे काम विज्ञान भारतीद्वारे केले जाते. गेल्या वर्षी विज्ञान भारतीच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या 'विज्ञान महोत्सवा'ची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉडने घेतली आहे. पुण्याच्या एम.आय.टी.बरोबर विविध उपक्रम, लघु उद्योजकांसाठी स्वतंत्र व्यासपीठाची स्थापना, स्मार्ट सिटीविषयी भारतीय विचारांचे जागरण असे कार्यक्रम घेण्यात येतात. 'शक्ती' या नावाने महिलांमध्यही विज्ञान भारतीचे कार्य चालू आहे. या माध्यमातून सर्वांगीण ग्रामविकास, तंत्रज्ञान विकसन, सामाजिक सबलीकरण असे प्रामुख्याने तीन विषय घेऊन विविध समाज घटकांपर्यंत पोहोचण्याचे; तसेच प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान-विज्ञान, आयुर्वेद, शेतीउद्योग, खगोलशास्त्र, आर्थिक विकास इ. अनेक विषयांत विज्ञान भारती कार्यरत आहे.

**संस्कार भारती** : संस्कार भारती विविध कलांच्या माध्यमातून सर्व कलाकारांना एकत्र आणून, विविध कलांची आणि भारतीय संस्कृतीची जपणूक करण्याचे काम देशभर करते. संस्थेच्या माध्यमातून रांगोळी, चित्रकला, शिल्पकला इ. कलांचे प्रशिक्षण दिले जाते व प्रात्यक्षिके सादर केली जातात. या माध्यमातून नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळत आहे. संस्कारभारतीच्या देशभरात १५०० शाखा कार्यरत आहेत.

**संस्कृत भारतीय** : सन १९९६ साली संस्कृत भाषेबद्दल प्रेम आणि आदर असलेल्या सर्वांनी एकत्र येऊन ही संस्था स्थापन केली. संस्कृत भारतीच्या माध्यमातून संस्कृत भाषेचा/विषयाचा प्रचार-प्रसार केला जातो. ही भाषा व्यावहारिक व्हावी यासाठी प्रोत्साहन दिले जाते. संस्कृत संभाषण वर्ग, शिबिरे, व्याख्याने घेतली जातात. संस्कृत भारतीच्या वतीने पत्राद्वारे संस्कृत

शिक्षण योजना सुरू आहे. पुण्यातील विविध भागांमध्ये संस्कृत भारतीचे कार्यक्रम व वर्ग आयोजित केले जातात.

**सुराज्य सर्वांगीण विकास प्रकल्प :** २००१ साली येरवडा येथे स्थापन झालेल्या या प्रकल्पाने सेवावस्त्यांमधील विद्यार्थी, महिला व मुली यांच्यावर लक्ष केंद्रित केले आहे. २३ वस्त्यांमध्ये संस्थेच्या १७ अभ्यासिका चालू आहेत. या अभ्यासिकांचा लाभ किमान ९०० विद्यार्थ्यांना मिळत आहे. १० वीनंतर याच अभ्यासिकांमधील मुले–मुली कार्यकर्ते म्हणून काम करतात. या प्रकल्पामुळे वस्त्यांमधील शाळा मध्येच सोडून देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी झाले. प्रकल्पाच्या संपर्कात आल्याने किमान १,५०० विद्यार्थी आपले शिक्षण पूर्ण करू शकले आहेत. या मुख्य कामाबरोबरच संस्थेमार्फत ४० बचतगट चालविले जात असून, गृहकर्ज उभारून गरजूंना पक्की घरे बांधून देण्यात आली आहेत.

**सेवा सहयोग :** सेवा सहयोग ही संस्था गेली १० वर्षे समाजातील दुर्बल घटकांसाठी शिक्षण; तसेच शिक्षणाच्या माध्यमातून आरोग्य, स्वच्छता आणि स्वावलंबन अशा सामाजिक कार्यात कार्यरत आहे. 'समुत्कर्ष' या वस्ती विकासाच्या उपक्रमामध्ये शहरातील विविध वस्त्यांतून ४८ अभ्यासिका चालतात. सध्या २५०० हून अधिक विद्यार्थी याचा लाभ घेत आहेत. वस्तीमधील तरुण, तरुणी, विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या स्वयंसेवी व्यक्तींच्या माध्यमातून या अभ्यासिका चालविल्या जातात. बालविकास, किशोर–किशोरी विकास व महिला विकास अशा तीन पातळ्यांवर कार्य चालते. महिला सक्षमीकरण या उपक्रमांतर्गत विविध वस्त्यांमधून महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. 'स्कूल कीट' (शालेय साहित्य) या उपक्रमाच्या माध्यमातून गेली १० वर्षे गरजू विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या, कंपास, पेन, पेन्सिल, चित्र वही आणि रंगीत खडू अशा साहित्याचा संच दिला जातो. १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत विविध कंपन्यांमधील स्वयंसेवक यासाठी देणगी देतात. दप्तरे तयार करणे व ती संस्थांपर्यंत नेण्यास सहकुटुंब सहभागी होतात. आतापर्यंत २७५ शाळांमधील ५०,००० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे. याव्यतिरिक्त फिरती विज्ञान प्रयोगशाळा, सेवा दर्शन, पर्यावरण संवर्धन, संगणक प्रशिक्षण आणि अन्य सेवा संस्था प्रशिक्षण असे उपक्रम संस्थेद्वारे राबवले जातात.

**स्वरूप–रूपवर्धिनी :** उपेक्षित वर्गातील बुद्धिमान मुलांसाठी १९७९ मध्ये किशाभाऊ पटवर्धन यांनी पुणे येथील मंगळवार पेठेत 'स्व'–रूपवर्धिनी या संस्थेची स्थापना केली. औपचारिक शाळा सुरू न करता, संध्याकाळच्या वेळेत चालणाऱ्या या कामाची सुरुवात १२ मुलांना घेऊन झाली. आज पुण्याच्या वेगवेगळ्या भागात संस्थेच्या १६ शाखा चालतात, ज्याचा लाभ ८०० मुले–मुली घेत आहेत. खेळ, अभ्यास, मार्गदर्शन, प्रेरणादायी व्याख्याने, शिबिरे, सहली अशा उपक्रमांसोबतच संस्थेमार्फत विविध प्रकल्प चालतात. गरजू महिलांसाठी उद्योग शिक्षणातून २,५०० हून अधिक महिला स्वावलंबी झाल्या आहेत. स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्र – महाराष्ट्राच्या २३ जिल्ह्यांतून विद्यार्थी या केंद्राचा लाभ घेतात. बालवाडी – सेवावस्त्यांमधील ६,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी बालवाडीतून शिक्षण घेतले आहे. संस्थेतर्फे 'परिचारिका प्रशिक्षण दिले जाते. ***

**आरोग्य : 'आरोग्य हेच राष्ट्र धन' मानून अनेक संस्था निरोगी आरोग्यासाठी काम करीत आहेत. या विभागात रक्तपेढीपासून ते महिला आरोग्य, बाल आरोग्य, स्वच्छता यांसारख्या अनेक विषयांवर काम करणाऱ्या संस्थांची माहिती दिली आहे.**

**आरोग्य भारती :** सन २००२ मध्ये धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चतु:सूत्रीच्या आधारे कोची येथे संस्थेची स्थापना झाली.आरोग्य क्षेत्रात प्रचलित असणाऱ्या विभिन्न उपचार पद्धतींचा सन्मान ठेवून, सेवाभावी व्यक्तींना संघटित करून स्वस्थ राष्ट्र निर्माणासाठी संस्था प्रयत्नशील आहे. गावांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करून, ग्रामआरोग्य समिती स्थापन करणे, त्याचबरोबर आरोग्य

मित्र नेमणे, महिलांना 'आजीचा बटव्या'ची माहिती देणे, व्यायाम व सूर्यनमस्काराचा प्रचार व प्रसार करून, त्या अनुषंगाने शरीर निरोगी ठेवण्यासाठी विविध उपक्रम सातत्याने संस्थेमार्फत राबवले जातात.

**जनकल्याण रक्तपेढी :** आपल्या देशात गरजूंना असणारी रक्ताची आवश्यकता लक्षात घेऊन, १९८३ साली पुणे येथे रा.स्व. संघ जनकल्याण समितीद्वारे 'जनकल्याण रक्तपेढी'ची स्थापना झाली. आज या साखळीमध्ये एकूण १६ रक्तपेढ्या असून, त्यापैकी महाराष्ट्रात १३ आहेत. जनकल्याण रक्तपेढी गेल्या ३३ वर्षांपासून रक्तदानाच्या क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने काम करीत आहे.

* स्वेच्छा रक्तदान हाच रक्तपेढीच्या कार्याचा मंत्र आहे. सर्व रक्तसंकलन हे केवळ आणि केवळ स्वेच्छा रक्तदात्यांकडूनच होते. प्रत्येकाने वाढदिवशी रक्तदान करण्याची प्रथा आहे.

* काळानुसार अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर हे रक्तपेढीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. रक्तपेढीतील सर्व तांत्रिक प्रक्रियांसाठी स्वयंचलित व अद्ययावत अशा उपकरणांचा वापर करून रक्त व रक्तघटकांची सुरक्षितता जपली जाते.

* रक्तदान व वितरण यांबरोबरच आरोग्य शिक्षणाच्या क्षेत्रातही रक्तपेढी काम करीत आलेली आहे. रक्तदान, एनिमिया, थॅलेसेमिया इ. आवश्यक गोष्टींसंबंधी लोकशिक्षण होण्याकरिता नियमितपणे काही शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले जात असते. मागील तीन वर्षांत एकूण ३,७८५ युनिट्स रक्त हे थेलेसेमिया, हिमोफिलिया अशा आजारांनी ग्रस्त असलेल्या, तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील रुग्णांसाठी संपूर्णपणे मोफत वितरित केले आहे.

**जनकल्याण नेत्रपेढी :** जनकल्याण नेत्रपेढी ही संस्था नारायण पेठेत, विजय टॉकीजच्या शेजारी कार्यरत आहे. ही संस्था डोळ्यांविषयी विकार असलेल्या नागरिकांसाठी काम करते. या नेत्रपेढीमध्ये डोळे तपासणी मोफत केली जाते आणि योग्य प्रकारे समुपदेशन केले जाते. त्याचबरोबर डोळ्यांच्या विविध समस्यांवर शस्त्रक्रिया केल्या जातात. वेगवेगळ्या भागात नेत्रतपासणी शिबिरांचे आयोजन केले जाते. तसेच, सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'नेत्रदान' या विषयावर जाणीव–जागृती व नोंदणी केली जाते.

**तपस्या फाऊंडेशन :** पुण्यातील अनेक डॉक्टरांनी एकत्र येऊन २०१४ साली तपस्या फाऊंडेशनची स्थापना केली. संस्था विविध सामाजिक विषयांवर काम करीत आहे. पर्यावरण, पाणी, आरोग्य, शिक्षण या विषयांवर प्रामुख्याने ग्रामीण भागात काम केले जाते. गावांमध्ये विविध विषयांवर आरोग्य शिबिरे घेणे,

**निरामय :** विश्व हिंदू परिषदेच्या प्रेरणेने २००७ साली संस्थेच्या कामाला सुरुवात झाली. पुणे शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांतील ० ते ६ वयोगटातील बालकांचे लसीकरण हा संस्थेचा मुख्य उपक्रम आहे. या कामासाठी पुणे महानगरपालिकेने 'निरामय' संस्थेस १३५ झोपडपट्ट्यांची जबाबदारी सोपवली आहे. या १३५ झोपडपट्ट्यांमधील किमान ५०,००० मुलांचे लसीकरण 'निरामय'मार्फत केले आहे. त्याचबरोबर या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या किशोरवयीन मुलींसाठी १३ ठिकाणी किशोरी विकास प्रकल्प चालवले जातात. याचा लाभ किमान १,३०० मुली घेत आहेत. यामध्ये मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य, संस्कार, स्वावलंबन या चतुःसूत्रीवर काम केले जाते.

**महाराष्ट्र आरोग्य मंडळ :** सन १९९० साली कै. दादा गुजर यांनी महाराष्ट्र आरोग्य मंडळाची स्थापना केली. आदिवासी व ग्रामीण विकासासाठी काम करणे, हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रात संस्थेच्या १६ शाखा आदिवासी व ग्रामीण भागात कार्य करतात. 'आयुर्वेद' हा उपचाराचा आत्मा मानून त्यावर अभ्यास चालू आहे.

**सेवा आरोग्य फाऊंडेशन :** सर्वांगीण आरोग्य विकासासाठी 'आरोग्य हेच राष्ट्र धन' उद्दिष्ट ठेवून 'सेवा आरोग्य फाऊंडेशन' कार्यरत आहे. पुणे शहरातील

विविध वस्त्यांमध्ये 'आरोग्य वर्धन' प्रकल्पाच्या माध्यमातून वस्तीचे आरोग्य सुधारण्यासाठी, महिलांच्या हिमोग्लोबिन वाढीसाठी आरोग्य शिबिरे घरकाम करणाऱ्या महिलांच्या मुलांसाठी पाळणाघरात स्वयंसेवकांच्या माध्यमातून शिशुपोषण आहार देतात

**स्नेहसेवा :** स्नेहसेवा ही संस्था पुणे महानगरातील वस्त्यांमध्ये अल्पदरात आरोग्यसेवा पुरवण्याचे काम करते. विविध वस्त्यांमध्ये संस्थेमार्फत दवाखाने चालविले जातात. या दवाखान्यांमध्ये मोफत औषधे दिली जातात.

**नॅशनल मेडिको ऑरगनायझेशन** (NMO) : वैद्यकीय क्षेत्रामध्ये डॉक्टर आणि वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी यांना एकत्र करून त्यांच्याद्वारे विविध सामाजिक उपक्रम NMO संस्थेद्वारे घेतले जातात. १९८७ साली संस्थेची स्थापना झाली. संस्थेद्वारे ग्रामीण भागामध्ये आरोग्य शिबिरे व आरोग्यासंदर्भात जनजागृती कार्यक्रम घेतले जातात. ईशान्य भारतातील राज्यांमध्ये धन्वंतरी सेवा यात्रा हा उपक्रम दर वर्षी घेतला जातो. ***

**महिला विकास : शिक्षण, आरोग्य, संस्कार, स्व-संरक्षण, स्वावलंबन, हक्क इ. अनेक विषयांत महिला सशक्तीकरणासाठी पुण्यातील खालील संस्था काम करतात.**

**चैतन्य महिला मंडळ** : महिलांच्या सर्वांगीण विकासाबरोबर समाजात त्यांना स्थान आणि सुरक्षितता प्राप्त करून देण्यासाठी १९९४ साली चैतन्य महिला मंडळाची स्थापना झाली. वंचित, पीडित आणि शोषित महिलांचे पुनर्वसन करणे हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. मोशी येथील संस्थेच्या वसतिगृहात लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिलांचे, मुलींचे पुनर्वसनही केले जाते. संस्थेच्या माध्यमातून 'कुटुंबसखी' नावाने समुपदेशन केंद्र, 'उत्कर्ष' नावाने देहविक्री करणाऱ्या महिलांच्या मुलांचे रात्रीचे पाळणाघर बुधवार पेठेत चालते.

**जागृती महिला व बालकल्याण संस्था** : एप्रिल २००५ मध्ये संस्थेची स्थापना झाली. ही संस्था महिला व बालकल्याणाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून सिंहगड मार्गावरील विविध भागात काम करते. गरजू महिला व बालके यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करून, आवश्यक ती औषधे मोफत पुरविली जातात.

**दृष्टी स्त्री अध्ययन केंद्र** : दृष्टी स्त्री अध्ययन केंद्राच्या वतीने महिलांच्या समस्यांचे सर्वेक्षण व अध्ययन केले जाते. 'महिला विश्व' हे संकलित वृत्त दर वर्षी प्रकाशित करण्यात येते. मणिपूर येथेही महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणारे एक सर्वेक्षण केले. 'दृष्टी'मध्ये महिलांच्या सबलीकरणाच्या संदर्भातील धोरणे व योजना याचे अध्ययन होते. त्यासाठी चर्चासत्रे, सर्वेक्षण, व्याख्यानमाला, गटचर्चा इ. आयोजन केले जाते.

**भगिनी निवेदिता प्रतिष्ठान** : भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, पुणे ही संस्था १९७९ साली स्थापन झाली. ही संस्था सर्व स्तरांतील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिला-बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करत आहे. या संस्थेत विविध क्षेत्रांतील मान्यवर महिला स्वयंसेवी वृत्तीने काम करीत आहेत. सामान्य स्त्रीचा विकास करणे, गुणवत्ता वाढवणे, मुलांच्या आनंददायी शिक्षणासाठी प्रयत्न करणे इ. प्रकारचे विविध उपक्रम संस्थेच्या माध्यमातून राबविले जातात. संस्था प्रामुख्याने शिक्षण, महिला सक्षमीकरण व आरोग्य या विषयांत कार्य करते.

**भारतीय स्त्री शक्ती जागरण :** स्त्रियांचा सर्वांगीण विकास, त्यांच्यावरील अन्याय-अत्याचारास विरोध व त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी भारतीय स्त्री जागरण गेली ३० वर्षे कार्यरत आहे. स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये निषेध पत्रके, निषेध सभा, मोर्चा, पोलीस कमिशनरना निवेदने देणे इ. मार्गही अवलंबिले जातात. महिला धोरण, कायद्यात बदल इ.संदर्भात मंत्रालय/आयोग इ.ना वेळोवेळी सूचना पाठविल्या जातात. किशोरवयीन मुलींना त्यांच्यात होणारे शारीरिक, मानसिक बदल; जबाबदार लैंगिक वर्तन; यासाठी विविध शाळांतून 'कळी उमलताना' कार्यक्रम व किशोरी विकास प्रकल्प सुरू आहेत. याच धर्तीवर किशोरवयीन मुलांसाठीसुद्धा

कार्यक्रम करण्याची; तसेच बाललैंगिक शोषण हा विषय हाती घेण्याची योजना आहे. पुण्याच्या विविध भागांत ६५ महिला बचतगट आहेत. समस्याग्रस्त स्त्री–पुरुषांना कुटुंब सल्ला केंद्रात कायदेविषयक मदत दिली जाते.

**सुरभी संस्था** : सुरभी ही संस्था सिंहगड मार्गावरील विठ्ठलवाडी, माणिकबाग, वडगाव या भागात विशेष करून कमी उत्पन्न गटातील महिलांसाठी काम करते. महिलांद्वारे महिलांसाठी पतसंस्था चालविली जाते.

**स्नेहालय** : अहमदनगर येथे १९८९ साली निराधार महिला व मुलांसाठी काम करण्यासाठी संस्थेची स्थापना झाली. संस्थेच्या १७ प्रकल्पांपैकी एक प्रकल्प पुणे येथे 'स्नेहाधार' नावाने सुरू झाला आहे. या प्रकल्पा मार्फत अत्याचारित, संकटग्रस्त, निराधार, बेघर महिलांना तातडीने सुरक्षित आश्रय दिला जातो. त्यासाठी पुण्यातील आंबेगाव येथे 'स्नेहाधार पुनर्वसन संकुल' बांधण्यात आले आहे. ***

## दिव्यांग व्यक्तिविकास आणि विशेष मुले

**:'आत्मविश्वास संवर्धन', शिक्षण, स्वावलंबन, समुपदेशन अशा विविध आयामातून दिव्यांग व्यक्ती व विशेष मुलांचा विकास करण्यासाठी पुण्यामध्ये खालील संस्था कार्यरत आहेत.**

**अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था आणि संशोधन केंद्रः** शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या मुलांसाठी १९५६ साली या संस्थेची स्थापना झाली. या माध्यमातून अपंगांचे पुनर्वसन होत आहे. वानवडी येथे अपंग विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयींनीयुक्त वसतिगृह व प्रशिक्षण केंद्र चालविले जाते. तसेच त्यांना शिक्षण व कौशल्य प्रशिक्षणाद्वारे स्वावलंबी बनविण्याचे कार्य केले जाते. त्याचबरोबर अपंग कल्याणासाठी विविध चर्चासत्रे, प्रशिक्षण, व्याख्याने इ.चे आयोजन केले जाते. संस्था अपंगांसाठीची शासकीय धोरणे व आवश्यक संशोधनासाठीदेखील कार्यरत आहे.

**डॉ. शांता वैद्य स्मृती प्रतिष्ठान** : (अध्ययन अक्षम मुलांसाठी क्षमता संवर्धन व संशोधन केंद्र) जगभरातील १०% मुले या गटात मोडतात. या गटासाठी विशेष, वेगळे प्रयत्न होण्याच्या गरजेतून २००८ साली संस्थेचे काम सुरू झाले. संस्था प्रामुख्याने खालील प्रकारे काम करते. मुलांसाठी मानसशास्त्रीय चाचण्या, रेमेडिअल टीचिंग व विविध कार्यशाळा, मुले व पालक यांच्यासाठी समुपदेशन, शैक्षणिक साधनांचा विकास, अभ्यास व संशोधन, जाणीव–जागृती, या विषयांचे साहित्य भारतीय भाषांमध्ये प्रसिद्ध करणे.

**ध्रुव एज्युकेशनल ॲन्ड रिसर्च फाउंडेशन** : सामान्य, तसेच विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या शैक्षणिक गरजांसंदर्भात ही संस्था २०११पासून कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून खालील प्रकारचे उपक्रम राबविले जातात.

१) विशेष गरजा असलेल्या, परंतु मुख्य प्रवाहातील शाळेत शिकू शकणाऱ्या (अध्ययन अक्षम, स्वमग्न, Dwon\s syndrome असणाऱ्या, गतिमंद इ.) मुलांचे प्रशिक्षण व विकास शाळेच्या मुख्य प्रवाहातच होण्यासाठी शहरातील शाळांमध्ये प्रयत्न करणे. २) वर उल्लेखलेल्या मुलांसाठी Speech Therapy, Remedial Teaching, भाषा विकसन, संभाषण कौशल्य व कारक कौशल्य विकसन, यासाठी प्रशिक्षित शिक्षकांमार्फत मुलांच्या शाळेत, तसेच संस्थांमध्ये व्यक्तिगत प्रशिक्षण. ३) शिक्षक व पालकांमध्ये वरील विषयांबाबत जागृती करणे. ४) करिअर समुपदेशन :१० वी व त्यापुढील विद्यार्थ्यांची कलचाचणी, व्यक्तिमत्त्व चाचणी व हस्ताक्षर चाचणी घेणे. ५) वर्तन समुपदेशनः किशोरवयीन मुलांचे पालकांशी असलेले नाते व त्यांचे स्वतःचे वर्तन यासंबंधी विद्यार्थी व पालक यांचे समुपदेशन. ६) प्रशिक्षण शिबिरेः विद्यार्थ्यांना अभ्यासात गोडी निर्माण व्हावी; स्व–अध्ययन कौशल्ये, सभाधीटपणा वाढावा, अभ्यासाशिवाय इतर कौशल्यांचा विकास व्हावा, यासाठी प्रशिक्षण देणे.

**भारत विकास परिषद** : भारत विकास परिषद या संस्थेची स्थापना १९६३ साली झाली. मानवी जीवन, शिक्षण, सामाजिक धोरण, अध्यात्म इ. अनेक विषयांवर संस्था कार्यरत आहे. निरोगी, समर्थ आणि सुसंस्कृत

भारत बनवणे, हे लक्ष्य डोळ्यांसमोर ठेवून संस्था स्वामी विवेकानंदांच्या शिकवणुकीनुसार कार्य करते. आदिवासी विकास, ग्रामीण आणि शहरी विकासाच्या क्षेत्रातही संस्था काम करते. पुण्यामध्ये अपंगांसाठी कृत्रिम पायरोपण केंद्र चालविले जाते. केंद्राद्वारे विविध ठिकाणी अपंगांसाठी शिबिरे व प्रबोधनपर कार्यक्रम घेतले जातात; जनकल्याण रक्तपेढीच्या सहयोगाने अल्पदरात पॅथॉलॉजी लॅब चालविली जाते. मुला-मुलींसाठी देशभक्तीपर गीतांच्या स्पर्धा होतात.

**मेक माय ड्रीम :** मेक माय ड्रीम ही संस्था मेधा कुलकर्णी यांनी २००९ साली स्थापन केली. या संस्थेच्या अंतर्गत अपंग विद्यार्थ्यांना १०वीनंतरच्या पुढील शिक्षणासाठी लागणारी सर्वतोपरी मदत व करिअर समुपदेशन केले जाते.

**सक्षम :** 'समदृष्टी, क्षमता विकास, तसेच अनुसंधान मंडल (सक्षम)' ही संस्था विकलांग बांधवांची सहायता व विकास करण्याच्या उद्देशाने २००८पासून कार्यरत आहे. सर्व प्रकारच्या विकलांगांचा सर्वांगीण व सर्वंकष विकास साधून, त्यांना व्यापक दृष्टीने त्यांचा सामाजिक करणे व राष्ट्र उभारणीच्या कार्यात त्यांना सामील करून घेणे, हे संस्थेचे ध्येय आहे. देशभरात ३५ ठिकाणी 'सक्षम'चे काम सक्षमपणे चालू आहे. सक्षम व अन्य संस्थांच्या साहाय्याने ११०पेक्षा जास्त प्रकल्प निरनिराळ्या ठिकाणी चालू आहेत. नेत्रदान, दृष्टीबाधितांचे शिक्षण, श्राव्य व ब्रेल साहित्य निर्मिती अशा विविध माध्यमातून विकलांगांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्न केले जातात. ***

**संस्कार : सामाजिक जाणिवेतून लहान मुलांसाठी अनेक संस्था मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी 'संस्कार' या विषयात विविध कार्यक्रम, क्रीडाकेंद्र, संस्कारवर्ग इ. उपक्रमांद्वारे कार्य करीत आहेत.**

**जनकल्याण समिती :** सन १९७२ साली दुष्काळग्रस्तांसाठी दुष्काळ विमोचन समितीच्या माध्यमातून जनकल्याण समितीचे काम सुरू झाले. या कामातूनच पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेतून महाराष्ट्रात सुमारे १४०० सेवाकार्ये सुरू आहेत. जनकल्याण समितीच्या वतीने शिक्षण, संस्कार, आरोग्य, पूर्वांचल विकास, वनवासी विकास, कृषी आणि आपत्कालीन व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांमध्ये कार्य केले जाते. महाराष्ट्र व गुजरातमधील भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन, दुष्काळग्रस्त भागात चारा वाटप केंद्र, पाण्याचे टँकर पुरवणे, पाण्याच्या टाक्या पुरवणे, शेतकऱ्यांना बी-बियाणे पुरवणे, जनावरांच्या छावण्या चालविणे इ.प्रकारचे भरीव काम जनकल्याण समितीने केले आहे. महाराष्ट्रातील दुष्काळी भागांमध्ये, ग्रामीण क्षेत्रात जलसंधारण, विहीर पुनर्भरण, गाळ उपसा, पाणलोट इ.ची कामे समितीने हाती घेऊन शेकडो गावांतील पाणीसमस्या सोडविली आहे.

**जनसेवा न्यास :** हडपसर परिसरातील ग्रामीण, तसेच शहरी भागात विविध क्षेत्रात सामाजिक कार्यातून प्रकल्प उभे राहावेत, या हेतूने जनसेवा न्यासाची स्थापना १९९७ मध्ये झाली. समाजातील दुर्बल, गरजू लोकांना समर्थ बनविण्यासाठी जनसेवा न्यासाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात प्रामुख्याने युवक, महिला आणि लहान मुले यांच्याकरिता काम केले जाते. 'जनसेवा न्यास ट्रेनिंग अॅकॅडमी'च्या माध्यमातून विविध कोर्सेस घेतले जातात. महिलांना व मुलीना स्वावलंबी करण्यासाठी विविध कौशल्याधारित अभ्यासक्रम घेतले जातात. या केंद्रात अर्धवेळ आणि पूर्णवेळ प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. येथील प्रत्येक प्रशिक्षणार्थी स्वयंपूर्ण व्हावा म्हणून तज्ज्ञ शिक्षकवर्ग, मार्गदर्शक व्याख्याने, प्रात्यक्षिके, कामाचा भरपूर अनुभव यासारखे उपक्रम राबवले जातात.

**नंदादीप पाळणाघर :** सन २००० सालापासून पुण्याच्या कर्वेनगर भागात घरकाम करणाऱ्या महिलांच्या मुलांसाठी अत्यल्पदरात पाळणाघर सुरू आहे. ६ महिन्यांपासून ते १४ वर्षांपर्यंतची मुले/मुली येथे सांभाळली जातात. ६ वर्षांच्या आतील मुलांसाठी ३ गटांमध्ये शाळा चालविली जाते.

**बालगोकुलम् :** सोसायटीमध्ये आणि अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या मुला-मुलींसाठी बालगोकुलम् प्रकल्प चालविला जातो. त्याच सोसायटी/अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या व्यक्तीनी स्वयंसेवीवृत्तीने आठवड्यातून एकदा एक तास बालगोकुलम् चा संस्कारवर्ग चालवणे अपेक्षित आहे. त्यात शारीरिक/बौद्धिक कार्यक्रमांचा समावेश करण्यात येतो. सूर्यनमस्कार, देशभक्तीपर गीते, श्लोक, थोर पुरुषांच्या गोष्टी अशा विविध कार्यक्रमांमधून 'बालगोकुलम्' चालवले जाते.

**भारत भारती :** आपल्या देशातील विविध राज्यांमधून पुणे महानगरात राहावयास आलेल्या कुटुंबांसाठी भारत भारती काम करते. यामध्ये विविध भाषा, पंथ, चालीरिती असणाऱ्या सर्व भारतीयांना एकत्रित करून, त्यांचे विविध कार्यक्रम केले जातात. ज्यात प्रजासत्ताकदिनी आनंद मेळावा, विविध व्याख्याने, शिबिरे इ.चे आयोजन केले जाते. 'आपण सारे भारतीय एक होऊ', या भावनेने भारत भारतीचे काम चालते. 'रक्षाबंधन' सणानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करतात.

**राष्ट्र सेविका समिती :** राष्ट्र सेविका समिती हे महिलांसाठी काम करणारे अखील भारतीय संघटन आहे. समितीची स्थापना १९३६ साली झाली. स्त्रियांना संघटित करून त्यांना स्वसंरक्षणक्षम बनविण्याचे ध्येय घेऊन देशातील सर्व प्रांतांमध्ये तसेच भारताबाहेर अन्य २१ देशांमध्ये समितीचे काम चालते. या देशाला सुखी, समृद्ध, संपन्न करण्यासाठी समिती देशभरातील हजारो शाखांच्या माध्यमातून कार्य करते. समितीच्या शाखांद्वारे महिलांना शारीरिक, बौद्धिक, वैचारिक प्रशिक्षण दिले जाते. पुणे महानगरात समितीच्या ४४ शाखा आहेत. शिक्षण, संस्कारवर्ग, क्रीडा, वाचनालय, योगासन वर्ग, पौरोहित्य वर्ग इ. विविध उपक्रम समितीद्वारे चालवले जातात. गरजूंसाठी वसतिगृह, रुग्णोपयोगी साहित्य केंद्र, आधारनिधी याद्वारे काम चालते.

**स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान :** स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान, सिंहगड मार्ग, पुणे येथे कार्यरत आहे. संस्थेद्वारे शिक्षण, संस्कार, स्वावलंबन आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये विविध सेवाप्रकल्प चालविले जातात. दत्तवाडी, विठ्ठलवाडी, आनंदनगर, धायरी परिसरातील विविध सेवावस्त्यांमध्ये संस्कारवर्ग, अभ्यासिका, दवाखाना, महिला रोजगार प्रशिक्षण इ. प्रकल्प चालविले जातात. विविध सोसायट्यांमधून जुने कपडे संकलित करून महिलांना त्यापासून विविध वस्तू तयार करण्याचे काम दिले जाते.

***

**सामाजिक सुरक्षा : समाजामधील विविध वंचित, पीडित, शोषित घटकांच्या पुनर्वसनासाठी विविध सामाजिक संस्था कार्यरत आहेत. यामध्ये ज्येष्ठ, महिला, मुले तसेच आपत्ती निवारणासाठी प्रयत्न केले जातात.**

**इंडिया हेल्थ लाईन :** आरोग्य विषयांत २०१३पासून 'इंडिया हेल्थ लाईन' ही संस्था काम करते. भारत हा तरुणांचा देश असल्याने देशातील तरुण सुदृढ असला पाहिजे, या उद्देशाने संस्था काम करते. आरोग्य विषयात काम करणाऱ्या स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले जाते. नागरिकांची शुगर, ब्लडप्रेशर, हिमोग्लोबिन या गोष्टींची नियमित तपासणी प्रशिक्षित स्वयंसेवकांमार्फत केली जाते.

**ग्राहक पंचायत :** अखिल भारतीय ग्राहक पंचायत ही भारतातील ग्राहकांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था १९९२ साली स्थापन झाली. ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, ग्राहक पंचायतीच्या माध्यमातून ग्राहकांना न्याय मिळवून देणे, ग्राहकाची फसवणूक झाल्यास पंचायतीमार्फत तक्रार दाखल करून घेतली जाते.

**जम्मू-कश्मिर अभ्यास केंद्र :** संपूर्ण भारताला जम्मू-काश्मिरची ओळख पर्यटनाच्या माध्यमातून आणि निमलष्करी, लष्करी कारवायांच्या बातम्यांवरून होत असते. या राज्याच्या अनेक प्रश्नांचा सामान्य नागरिकाला, तसेच कायदेमंडळातील जनतेच्या प्रतिनिधींनाही जाणीव नसते. घटनात्मक आणि कायदेशीर बाबी, जम्मू-काश्मिरचे संरक्षणात्मक आणि

सामरिक महत्त्व, केंद्र आणि राज्य संबंधातील अनेक दुवे, आर्थिक बाबी, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक धोरणे, राखीव जागांचा प्रश्न, शेतीविषयक आणि पर्यावरणाचा अभ्यास आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे वेगवेगळ्या काळात भारतात आलेले आणि जम्मू-काश्मिरमधून निर्वासित झालेल्या लोकसमुहांना त्यांचे मूलभूत हक्क - घटनात्मक आणि मानवी अधिकार - जम्मू-काश्मिरचा इतिहास, कला, संगीत, वाङ्मय, वास्तुकला, मूर्तिकला या विषयांचा अभ्यास केला जातो.

**पूर्वांचल विकास** : रा. स्व. संघ जनकल्याण समिती, महाराष्ट्र प्रांत ही संस्था अन्य सेवाप्रकल्पांबरोबरच पूर्वांचलातील विशेषत: मेघालय, नागालँड व मणिपूरचा पहाडी प्रदेश येथील मुला-मुलींसाठी महाराष्ट्रामध्ये आठ छात्रावास चालवित आहे.

**पूर्व सैनिक सेवा परिषद** : पूर्व सैनिक सेवा परिषद ही या संघटनेत माजी सैनिक, अधिकारी, कर्मचारी एकत्रित येऊन सेवा भावनेने काम करीत आहेत. राष्ट्र व धर्म हिताचे रक्षण करण्याचे कार्य परिषदेमार्फत केले जाते. विशेषत: ग्रामीण भागातील सैनिक कुटुंबांना सर्वतोपरी मदत.

**प्रबोधन मंच** : प्रबोधन मंचाची स्थापन २००४ झाली आहे. शिक्षण, क्रीडा, आर्थिक व्यवस्था, अंधश्रद्धा आदी विविध विषयांवर जनजागृती करून व्याख्याने/कार्याशाळांच्या माध्यमातून प्रबोधन करणे, हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. असे प्रबोधनात्मक कार्यक्रम महाराष्ट्रभर केले जातात. 'विमर्श' हे त्रैमासिक संस्थेच्या माध्यमातून प्रकाशित केले जाते.

**माहेरवाट** : सन १९९४ साली ज्येष्ठ नागरिकांसाठी 'माहेरवाट' संस्थेची स्थापना झाली. पुण्यातील सिंहगड मार्गावरील धायरी भागात अंध, अपंग, मानसिक रुग्ण असणाऱ्या ४० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था केली जाते.

**माय होम इंडिया** : देशाच्या विविध भागांमध्ये भावनिक एकात्मता निर्माण करण्याच्या उद्देशाने संस्थेची स्थापना झाली. भारताच्या ईशान्येकडील असलेला अरुणाचल प्रदेश चिनी स्वारी, बांगलादेशी घुसखोरी, अमली पदार्थांची तस्करी आणि दहशतवाद अशा गंभीर समस्यांना तोंड देत आहे. गेली ६ वर्षे ही संस्था या विषयात काम करीत आहे. संस्थेमार्फत प्रामुख्याने ईशान्य भारताविषयीचे चित्र सर्वांसमोर आणण्यासाठी, व्यक्तींना प्रोत्साहन देऊन, सहल आयोजित करणे, त्या अनुषंगाने या भागात काम करण्यासाठी स्वयंसेवक मिळविणे, येथील विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी वसतिगृहात ठेवून, त्यांचे शिक्षण पूर्ण होण्यास मदत करणे अशा प्रकारची कामे केली जातात.

**मेघालय छात्रावास** : ईशान्य भारतातील मेघालय हे दुर्लक्षित राज्य आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समिती, महाराष्ट्र प्रांतामार्फत मेघालयातील विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी वसतिगृह चालविले जाते. ईशान्येकडील अनेक राज्यांमध्ये इतरही अनेक समस्या आहेत. शिक्षण ही मूलभूत समस्या आहे. या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे; या हेतूने काही दानशूर व्यक्तींनी ही समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. मिझोराम, मेघालय, नागालँड या तीन राज्यातील विद्यार्थी महाराष्ट्रात आणून, त्यांना वसतिगृहात ठेवून त्यांचे शिक्षण तर पूर्ण केले जाते.

**भटके विमुक्त विकास परिषद** : यमगरवाडी हा प्रकल्प भटके-विमुक्तांसाठी १९९३मध्ये सुरू करण्यात आला. उस्मानाबाद जिल्ह्यातील यमगरवाडी या ठिकाणी १८ एकरवर हा प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून एकलव्य प्राथमिक निवासी शाळा, माध्यमिक शाळा; तसेच विविध कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रम सुरू आहे. 'शबरीमाता' या मुलींसाठी असलेल्या वसतिगृहात आज १८० मुली शिक्षण घेत आहेत. अनेक विद्यार्थी आज शिक्षक बनले आहेत, काही पोलीस सेवेत रुजू झाले आहेत. महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांमध्ये ४८ पालावरच्या शाळा चालू आहे.

**लोकशाही जागर मंच** : संवाद, संघटन व संघर्ष या त्रिसूत्रीच्या आधारे स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूलभूत तत्त्वांवर संस्थेचे काम चालते. 'स्व-रूपवर्धिनी' संस्थेतील

तरुणांनी एकत्र येऊन या संस्थेची स्थापना केली. राष्ट्रीय सामाजिक विषयांवर अभ्यासवर्ग घेतले जातात.

**लघु उद्योग भारती :** लघु उद्योग भारतीची स्थापना १९९४ साली करण्यात आली. लघु तसेच मध्यम उद्योग देशाच्या औद्योगिक अर्थव्यवस्थेमध्ये एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावते आहे. भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या दृष्टीने आणि मूल्यनिर्मितीच्या दृष्टीने लघु उद्योगाचा वाटा ३३% आहे. लघु उद्योग भारतीच्या वतीने बेरोजगारांना रोजगाराभिमुख आणि कौशल्याधिष्ठित प्रशिक्षण देणे आणि उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देणे हे कार्य करतो.

**वनवासी कल्याण आश्रम :** सलग ६३ वर्षे वनवासी बांधवांसाठी वनवासी कल्याण आश्रम कार्य करीत आहे. संपूर्ण देशात २४६ औपचारिक विद्यालये (प्राथमिक, माध्यमिक विद्यालये इ.) व ४,२१४ अनौपचरिक विद्यालये (एकल विद्यालये, संस्कारकेंद्र इ.) असे शैक्षणिक प्रकल्प कार्यान्वित आहेत. वनवासी कल्याण आश्रमाची भारतात २१९ वसतिगृहे चालू आहेत. श्रद्धाजागरण या अंतर्गत व्यसनमुक्तीचे कार्यदेखील संस्थेमार्फत केले जाते. वनवासी बांधवांच्या 'खेलकूद' उपक्रमांतर्गत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते.

**शिवसमर्थ प्रतिष्ठान :** 'शिवसमर्थ प्रतिष्ठान'ची स्थापना सिंहगड मार्गावरील विठ्ठलवाडी येथे २००४ साली झाली. संस्थेद्वारे विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम हाती घेतले जातात. व्यसनांमुळे अथवा तात्कालिक लाभामुळे भरकटलेल्या तरुण-तरुणींना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम संस्था करते.

**सैनिक मित्र परिवार :** सॅल्युट फॉर सर्व्हिस अँड सॅक्रीफाइज या उद्देशाने १९९६ साली सर्वसामान्य नागरिकांनी मिळून ही संस्था स्थापन केली. सीमारक्षक जवान, शहीद परिवार, निवृत्त सैनिक, अपंग आणि रुग्ण जवान अशा चारही स्तरांवर ही संस्था कार्य करते. संस्थेमार्फत सैन्य भरती, प्रबोधन, जागरण, विविध सण/उत्सव सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांसमवेत साजरे करणे. त्याचबरोबर सैनिक/कुटुंबियांच्या अडचणी सोडवणे, त्यांना आर्थिक मदत मिळवून देणे. सैनिक आणि देशवासियांच्या सुसंवादातून राष्ट्रीयत्वाची भावना जागवणे हे उपक्रम राबविले जातात.

**हिंदू हेल्पलाईन :** विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून यांच्या पुढाकाराने 'हिंदू हेल्प लाईन'ची स्थापना २०१४मध्ये झाली. सध्या भारतात हिंदू हेल्प लाईनची ५० केंद्रे कार्यरत आहेत. या केंद्रांमध्ये २४ तास हेल्पलाईन फोन नंबरद्वारे सेवा देण्यात येते. संस्थेचा प्रमुख उद्देश धार्मिक समस्या, प्रश्न, सामाजिक सुरक्षा-समस्या यांवर मार्गदर्शन करणे, हा आहे. ***

**ग्रामविकास पाणी, पर्यावरण : ग्रामविकास, पर्यावरण, पाणी, गो-सेवा अशा क्षेत्रांमध्ये लक्षणीय काम करणाऱ्या काही निवडक संस्थांची माहिती पुढे दिली आहे. पुणे शहरात राहूनही या संस्थांसोबत आपण काम करू शकता.**

**गो-विज्ञान संशोधन संस्था :** सन २००२ साली संस्थेची स्थापना झाली. देशी गाईंचे महत्त्व सांगून त्याचा प्रचार व प्रसार करण्याचे प्रमुख काम संस्थेमार्फत केले जाते. संस्थेमार्फत गो-आधारित शेतीवर मार्गदर्शन केले जाते. पंचगव्य आणि विविध वनौषधींपासून औषधनिर्मिती केली जाते. सध्या संस्थेचे ३ दवाखाने चालू आहेत.

**पूर्णम् इको व्हिजन फाऊंडेशन :** शाश्वत सर्वसमावेशक विकासाकरिता विविध समाजहिताचे उपक्रम करून; पर्यावरण संरक्षण व संवर्धन साधता येईल, या संकल्पनेमधून पूर्णम् इकोव्हिजन फाऊंडेशनची स्थापना झाली. पर्यावरणविषयक जनजागृती, संशोधन याचबरोबर पर्यावरण संरक्षण-संवर्धनाच्या कामात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी संस्था विविध उपक्रम राबवते. पुणे महानगरात सध्या २२ ठिकाणी ई-कचरा व प्लास्टिक संकलन केंद्रांची उभारणी केली आहे. बचतगटातील महिलांना टाकाऊ वस्तूंपासून विविध

प्रकारच्या टिकाऊ वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण देऊन, त्याद्वारे त्यांना स्वावलंबी बनविण्यात येत आहे.

**योजक** : नैसर्गिक संसाधन व पर्यावरणाचा ढासळत चाललेला तोल सांभाळण्यासाठी व त्यावर वैज्ञानिक पद्धतीने उपाय योजण्यासाठी 'योजक' या संस्थेचा उदय झाला. ही संस्था शास्त्रीय पद्धतीने पर्यावरणाचा अभ्यास करते.

**राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास** : राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास ही संस्था अंबडवेट, ता. मुळशी, जि. पुणे येथे कार्यरत आहे. संस्थेच्या अंतर्गत विविध प्रकल्प चालतात. त्याअंतर्गत बाल विद्या मंदिर, १ली ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'स्वामी विवेकानंद विद्यालय', १०वी नापासांसाठी हिंमतशाळा, पुरुष बचतगट, कातकरी वस्ती विकास, आय.बी.टी. सेंटर, महिला विभागांतर्गत विविध प्रकल्प, मराठवाडा वस्ती विकास आदी प्रकल्पांद्वारे संस्था काम करीत आहे.

**सरसेनापती हंबीरराव मोहिते गोशाला** : सन २००१ साली वडकी, ता. हवेली, जि. पुणे येथे गोशाळेची स्थापना करण्यात आली. निराधार गायी-बैलांना आश्रय देण्याचे काम गोशाळेमार्फत केले जाते. आजमितीस संस्थेत २७०पेक्षा जास्त जनावरे आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना बैल दत्तक देण्याचा आगळा-वेगळा उपक्रम संस्था करीत आहे. संस्थेच्या माध्यमातून निरनिराळे सामाजिक उपक्रम केले जातात.

**सुयश चॅरिटेबल ट्रस्ट** : 'यशप्रभा उद्योग समूहा'अंतर्गत सुयश चॅरिटेबल ट्रस्ट, ही संस्था गेल्या ३६ वर्षांपासून दुर्गम वनवासी भागांत वनवासी परिवारांना सेंद्रिय शेतीमधून आर्थिक सक्षमता आणि संपन्नता मिळवून देण्याचे कार्य करीत आहे. सुयश संस्था ५ प्रांतातील ३६००पेक्षा जास्त गावांमध्ये सेंद्रिय कृषी विकासातून गावे सक्षम व संपन्न करण्यासाठीचे काम करीत आहे. त्यातून ३००० गावांतील १ लाख परिवार गरिबी रेषेच्यावर येऊन पूर्णपणे सक्षम व संपन्न झाली आहेत. २ ते ३ वर्षांच्या आत केवळ सेंद्रिय शेतीमधूनसुद्धा उत्पन्न वाढू शकते, हे वनवासी बांधवांना समजले आहे. विविध कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांच्या मदतीने 'सुयश'चे काम जोमाने चालू आहे. या वर्षी ४०० गावांची निवड सुयशच्या कार्यविस्तारासाठी केली आहे. 'सुयश'चे काम, तसेच 'सेंद्रिय कृषी'च्या प्रकल्पाबद्दल माहिती व्हावी, गावांची प्रगती व्हावी आणि गावांना परिवर्तनाची दिशा मिळावी, यासाठी 'सुयश प्रेरणा' नावाचे मासिक प्रकाशित होते. हे मासिक सध्या मराठी, हिंदी व उडिया भाषेत प्रकाशित होत आहे. सध्या हे मासिक ५ प्रांतांतील ४००० गावांत पोहोचत आहे. ***

**विविध उपक्रमशील संस्था : किल्ले संवर्धन, वाहतुक सुधारणा, विविध शासकीय योजनांचा अभ्यास, अन्नदान, रद्दी संकलन अशा विविध विषयांत उपक्रमांच्या माध्यमातून काही संस्था कार्यरत आहेत.**

**इतिहास प्रेमी मंडळ** : इतिहासाच्या जागरणातून समाजाच्या मनात देशभक्ती जागृत करण्याचे ध्येय ठेवून १९९९ पासून इतिहास प्रेमी मंडळ कार्य करीत आहे. इतिहासातील चरित्रे व कथांमधून प्रेरणा निर्माण करणे, ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व पटवून देऊन त्यांच्या संवर्धनाची प्रेरणा देणे.

**न्याय केंद्र** : अखिल भारतीय अधिवक्ता परिषद ही देशातील वकिलांना संघटित करणारी संघटना आहे. या संस्थेची स्थापना २५ वर्षांपूवी झाली. या संस्थेच्या अंतर्गत 'न्याय केंद्र' स्थापन केले आहे. 'न्यायप्रवाह' हे त्रैमासिक हिंदी व इंग्रजी भाषेतून प्रकाशित केले जाते. 'न्यायालयात न जाता न्याय' हा न्यायकेंद्र स्थापन करण्यामागचा हेतू आहे.

**सांगाती** : पुणे शहरात विविध आजारांनी ग्रस्त रुग्णांच्या उपचारामध्ये मदत करणारी ही एक आगळीवेगळी संस्था आहे. संस्थेद्वारे रुग्णांच्या आजारांचे योग्य निदान करून दिले जाते व उपचार मार्गदर्शन केले जाते.

**स्वामी विवेकानंद विचारमंच** : गेली १३ वर्षे सातत्याने हा विचारमंच प्रश्नमंजुषा, अभिनय, चित्रकला, लेखनकला, निबंधस्पर्धा त्याचप्रमाणे विविध विषयांवरील शिबिरांचे आयोजन केले जाते.

**श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ** : ही संस्था लोकमान्य टिळकांनी १९१५ साली स्थापन केली. संस्थेने रायगडावरील शिवछत्रपतींच्या समाधीचा जीर्णोद्धार, बांधकामही केले. शिवपुण्यतिथी उत्सव सुरू केला. ***

## संस्थाबांधणी व प्रशिक्षण संस्था :

**संस्थाबांधणी प्रशिक्षण, विविध विषयांचे सर्वेक्षण, अहवाल लेखन, निधी संकलन इ. विषयांवर कार्यरत.**

**रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी** : तीन दशकाहून अधिक वर्षे 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी' संस्था प्रशिक्षण–प्रबोधन–संशोधन या त्रिसूत्रीच्या आधारे काम करीत आहे. संस्थेचे पुणे येथे विभागीय कार्यालय असून मुख्य कार्यालय मुंबईजवळ भाईंदर येथे केशवसृष्टी या ठिकाणी आहे. राजकीय क्षेत्र, ग्रामपंचायत सदस्यांपासून आमदार, खासदार, राज्य सरकारचे मंत्री, तसेच स्वयंसेवी क्षेत्रांत बचतगटातील महिलांपासून पर्यावरणापर्यंतच्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण वर्ग घेतले जातात; तसेच संघटनशास्त्र, नेतृत्वशास्त्र व संस्थाबांधणी आणि व्यवस्थापन शास्त्राचे प्रशिक्षण दिले जाते.

**सेवावर्धिनी** : सन १९९८ साली सेवावर्धिनी संस्थेची स्थापना झाली. ही संस्था स्वयंसेवी संस्थांच्या संवर्धनासाठी प्रशिक्षण, मार्गदर्शनबरोबरच विविध सेवाप्रकल्प उभारणीसाठी सहयोग देते. शिक्षण, आरोग्य, महिला विकास, स्वावलंबन, ग्रामविकास, शेती इ. निरनिराळ्या क्षेत्रांत सेवावर्धिनी कार्यरत आहे. सी.एस.आर.च्या माध्यमातून ग्रामविकासाची कामे संस्था करीत आहे. 'जलदूत' प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील दुष्काळी जिल्ह्यांतील ३२ गावांमध्ये २२ सामाजिक संस्थांच्या सहकार्याने ४८ जलदूतांनी प्रशिक्षण घेऊन जलसंधारणाची कामे केली. संस्थेद्वारे लोकसहभागीय ग्रामीण अवलोकन (PRA) करून गावाचा विकासाचा आराखडा तयार करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले जाते. बायोगॅस प्रकल्प, सॅनिटरी नॅपकिन नष्ट करणे इ. प्रकल्पसुद्धा संस्थेमार्फत चालविले जातात.

**स्पार्क** : (Socialwork Practices And Research Centre) विवेक व्यासपीठ आणि महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने स्पार्क हे केंद्र २०१३ पासून कार्यरत आहे. स्पार्कद्वारे ग्रामीण भागातील समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सामाजिक कार्यानुभव (Block Placement Training) पूर्ण करून त्या विद्यार्थ्यांना विविध सेवासंस्थांशी जोडून दिले जाते. सामाजिक कामाची आवड असलेल्यांसाठी आणि सामाजिक संस्थेत काम करत असलेल्या व्यक्तींसाठी 'सामाजिक कार्य पदविका' (DSW) हा अभ्यासक्रम घेतला जातो. सेवावस्त्यांमध्ये सर्वेक्षण करून स्वयंसेवी संस्थांबरोबर मूलभूत प्रश्नांवर जाणीवजागृती करणे आणि गरजेनुसार विविध प्रकल्पांची उभारणी करण्याचे काम संस्था करते. सामाजिक संस्थांमार्फत सुरू असलेल्या कामांना गती आणि दिशा देण्याचे कामही स्पार्कमार्फत केले जाते. महाराष्ट्रात विविध विषयांवर काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची अद्ययावत माहिती स्पार्कमार्फत संकलित केली जाते.

**ज्ञानदा इन्स्टिट्युट ऑफ फ्लो पायपिंग टेक्नॉलॉजीः** या संस्थेची स्थापना २०१० साली वाघोली येथे झाली. संस्था शाळा आणि महाविद्यालयातून शिक्षण सोडून दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित अभ्यासक्रम चालविते. यात प्रामुख्याने २ महिन्यांचा प्लंबिंगचा अभ्यासक्रम घेतला जातो. या अभ्यासक्रमाद्वारे रोजगार उपलब्ध करून दिला जातो. सदर अभ्यासक्रम हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा असून याचा उपयोग शहरी आणि ग्रामीण भागातील अनेक बेरोजगार युवकांना होत आहे. तसेच कौशल्यप्राप्त प्लंबर अनेकानेक बांधकाम उद्योगांना प्राप्त होत आहेत. ***

# विश्व हिंदू परिषद प. महाराष्ट्र प्रांत बैठक उत्साहात संपन्न

विश्व हिंदू परिषद प. महाराष्ट्र प्रांत बैठक दिनांक २१ जानेवारी व २२ जानेवारी २०१६ रोजी निसर्ग रम्य हॉटेल सुरबन सातारा येथे संपन्न झाली. बैठकीची सुरवात दिवंगत कार्यकर्ते व कार्यकर्त्यांचे दिवंगत नातेवाईक यांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली.

दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करून बैठकीचे उदघाटन करण्यात आले. त्रिवार ओंकार, एकात्मता मंत्र व विजयमंत्र म्हणून बैठकीला औपचारिक सुरवात झाली, मंचावर मा. प्रांत अध्यक्ष श्री एकनाथराव शेटे सर, मा.मुंबई क्षेत्र मंत्री श्री शंकरजी गायकर, मा.प्रांत उपाध्यक्ष श्री बाबूजी नाटेकर , प्रांत मंत्री श्री विजयराव देशपांडे, प्रांत संघटनमंत्री श्री भाऊराव कुदळे , प्रांत सहमंत्री श्री विजयराव करमरकर उपस्थित होते. प्रथम सत्रात परिचय, स्वागत व प्रस्तावना प्रांत मंत्री श्री विजयराव देशपांडे यांनी केली, या सत्रात विविध निवेदने करण्यात आली त्यात पुणे महानगर–समरसता व सिंहगड जिल्हा रक्तदान यावर पुणे महानगर मंत्री श्री किशोरजी चव्हाण यांनी ,चिंचवड जिल्हा–हितचिंतक नोंदणी विशेष व आरोग्य शिबिर यावर चिंचवड जिल्हा सहमंत्री श्री नंदकुमार कुलकर्णी यांनी ,बारामती जिल्हा–नाथ म्हस्कोबा साखर कारखाना हितचिंतक नोंदणी श्री रामदासी सर यांनी तर प्रांत कार्यविभागात सेवा विभाग प्रांत सेवाप्रमुख श्री संजय मुरदाळे यांनी, समरसता–प्रांत समरसता पालक श्री संजयराव कुलकर्णी यांनी , समन्वय मंच – प्रांत उपाध्यक्ष श्री बाबूजी नाटेकर यांनी,मंदिर बचाव व हुतात्मा सैनिकांच्या पत्नीचा आर्थिक विषय– नाशिक विभाग दुर्गावाहिनी संयोजिका अँड.सौ. मीनलताई भोसले यांनी , बजरंग दल – प्रांत सहमंत्री श्री विवेक कुलकर्णी यांनी, गोरक्षा–प्रांत गोरक्षा प्रमुख श्री नागनाथ बोंगरगे यांनी व परिषद शिक्षा वर्ग – प्रांत संघटनमंत्री श्री भाऊराव कुदळे यांनी निवेदन केलेत. या सत्राचा आढावा प्रांत प्रशिक्षण प्रमुख श्री रामभाऊ महाजन यांनी घेतला.

द्वितीय सत्रात खर्चाला व बजेटला मंजुरी तसेच हिंदुबोध जाहिरातदार व वर्गणीदार हे विषय प्रांत सहमंत्री श्री विजयराव करमरकर यांनी मांडले. यानंतर मुंबई क्षेत्र मंत्री श्री शंकरजी गायकर यांनी हितचिंतक अभियानाचा आढावा घेतला प. महाराष्ट्र प्रांतातून सुमारे ५४००० हितचिंतक नोंदणी झाली. यामध्ये चिंचवड जिल्ह्यातून सर्वाधिक २०००० नोंदणी झाल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय बैठकीत सुचविण्यात आलेल्या आगामी कार्यक्रमवर त्यांनी विस्तृत मार्गदशन केले. आगामी काळात बजरंग दलाने प्रांत स्तरावर त्रिशूल दिक्षा असा कार्यक्रम घ्यावा व त्यात सर्व स्तरातील बजरंगी त्रिशूल दीक्षित करावेत .रामोत्सव हे धर्मसभा स्वरुपात घ्यावेत. प्रांत केंद्रस्थानी व जिल्हा केंद्र स्थानी मोठ्या धर्मसभा घ्याव्यात. तसेच प्रखंड स्तरावर धर्मसभा घ्याव्यात. धर्मरक्षा निधी कार्यक्रम फेब्रुवारी अखेर पर्यंत घ्यावेत प. महाराष्ट्र प्रांतात असे कार्यक्रम घेण्याचे निश्चित करण्यात आले. प्रशिक्षण वर्ग–यावेळी मे महिन्यात होणारा प्रांत बजरंग दल शौर्य

प्रशिक्षण वर्ग बारामती येथे दिनांक २० ते २८ मे २०१७ या कालावधीत तर दुर्गावाहिनी शौर्य प्रशिक्षण वर्ग अकलूज येथे दिनांक १८ ते २५ मे २०१७ या कालावधीत निश्चित करण्यात आला. तसेच मुंबई क्षेत्राचा परिषद परिचय वर्ग भुसावळ येथे दिनांक ११ ते २० मे २०१७ या कालावधीत निश्चित झाला आहे.

तृतीय सत्रात विभागशः आढावा बैठकी घेण्यात आल्यात. त्याचे निवेदने विभागाचे विभागमंत्री यांनी केले तर सत्र आढावा प्रांत संघटन मंत्री श्री भाऊराव कुदळे यांनी घेतला. चतुर्थ सत्रात प्रांतातील विविध नियुक्त्यांची घोषणा व बैठकीचा समारोप मा. प्रांत अध्यक्ष श्री एकनाथराव शेटे सर यांनी केला. बैठकीला मा. प्रांत कार्याध्यक्ष श्री पांडुरंगजी राउत मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांत सहमंत्री श्री विवेकजी कुलकर्णी यांनी केले.

नवीन नियुक्त्या पुढील प्रमाणे –

प्रांत सहमंत्री – श्री संजयराव मूरदाळे
प्रांत सेवाकार्य प्रमुख – श्री संजयराव कुलकर्णी
प्रांत सह कोषाध्यक्ष – श्री विजयराव करमरकर
प्रांत धर्माचार्य प्रमुख – श्री गमरे गुरुजी
प्रांत संस्कृत आयाम प्रमुख – श्री पेंनोरे महाराज
प्रांत समन्वय मंच – श्री अविनाशजी खाराईत
श्री शिवजी व्यास – प्रांत सहपालक मातृशक्ती व दुर्गावाहिनी
श्री किशोरजी मोदी – प्रांत कोष मंडळ सदस्य
श्री तुषार कुलकर्णी – पुणे महानगर सहमंत्री
श्री नितीन महाजन – महानगर सहसंयोजक बजरंगदल
श्री संजयराव देशपांडे – महानगर कोषाध्यक्ष
श्री नाना क्षीरसागर – पर्वती जिल्हा सहमंत्री
श्री अशोक पवार महाराज–संघटनमंत्री चिंचवडजिल्हा
श्री श्रीनिवास अमृतवाड–श्रीरामपूर जिल्हा सहमंत्री
डॉ श्री. प्रदिपराव उगले – नगर जिल्हा सहमंत्री

**वृत्तांकन – विवेक सोनक**
**प्रांत प्रचार प्रसिद्धी समिती सदस्य**

卐 卐 卐

**हिंदूबोध साठी - जाहिरातीचे विनम्र आवाहन**

हिंदूबोध हे मासिक गेली ११ वर्षे हिंदुत्व व संस्कार, भारतीयत्व व स्वाभिमान, स्वभाषा व संस्कृती, राष्ट्रीय सुरक्षा आणि सामंजस्य हिंदूंची सहिष्णुता आणि पराक्रम यांचे विवेचन करते. तसेच वि. हिं. प. चे सेवाप्रकल्प व आंदोलने यांचे समर्पक निवेदन देऊन समाजामध्ये जागृती करते. हिंदूबोध हे संपूर्ण हिंदू समाजाचे मुखपत्र व्हावे ही काळाचीच गरज आहे. या शुभकार्यात आपण जाहिरात देऊन हिंदूबोध च्या कार्यात सहभागी व्हावे व आपला व्यवसायही वृद्धींगत करावा. हिंदूबोध मासिकाचा वाचक वर्ग संपूर्ण महाराष्ट्रात पसरला असून महाराष्ट्र व बृहत् महाराष्ट्रातील शहरात व तळागाळातील ग्रामीण भागातही अंक वाचला जातो. आपली जाहिरात ही हिंदू बांधवांच्या जागृतीचे माध्यम व्हावे व आपणासही ऐहिक व पारमार्थिक यश मिळो ही शुभेच्छा. संपादक

जाहिरात दर पत्रक संपर्क : ९३७१००३७४८

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रंगीत पृष्ठक्र. २,३,४ | मासिक | ६,००० | वार्षिक | ६०,००० |
| कृष्ण धवल पूर्णपान | मासिक | ३,००० | वार्षिक | ३०,००० |
| कृष्ण धवल अर्धपान | मासिक | २,००० | वार्षिक | २०,००० |
| कृष्ण धवल १/४ | मासिक | १,००० | वार्षिक | १०,००० |
| कृष्ण धवल १/८ | मासिक | ५०० | वार्षिक | ५,००० |

**P. V. TAHARABADKAR :** Proprietor
GE
**GAYATRI**
ENTERPRISES
**MANUFACTURERS OF QUALITY RUBBER PRODUCTS.**
1322/23, Kudalwadi, Chikhali, Tal. Haveli,
Dist. Pune - 411 062. TEL : (0) 020 - 65328614
TELEFAX : 020 - 65328614 M : 9850008005
Email : gayatri_enter@vsnl.net



ॐ श्रीपरमात्मने नमः

# रामायणातील काही आदर्श व्यक्तिमत्वे

गीता प्रेस गोरखपूर या प्रकाशनाद्वारे प्रकाशित पुस्तिकेत श्री. जयदयालजी गोयन्दका यांनी लिहिलेल्या भगवान श्रीराम, श्रीलक्ष्मण, श्रीभरत आणि भगवद्भक्त श्रीहनुमंतांच्या चरित्रांचे संकलन आहे. श्री रामायणातील या सहाही व्यक्तींची चरित्रे अतिशय उदात्त आणि कार्यकर्त्यांसाठी आदर्श आहेत, अनुकरणीय आहेत. त्यांच्या पुण्यमय जीवनचरित्रांचे मनन आणि अनुकरण करून आपले कार्यजीवन शुद्ध व सफल करण्यासाठी हिंदूबोध मधून क्रमशः आम्ही देत आहोत. संपादक

## २) श्रीरामांची पितृ - भक्ती

अशाच प्रकारे श्रीरामप्रभूंची पितृभक्तदेखील मोठी अद्‌भुत होती. रामायणाचा अभ्यास करणाऱ्यांच्या बाबतीत ही गोष्ट लपून राहिली नाही की पित्याची आज्ञा पालन करण्यासाठी श्रीरामप्रभूंच्या मनात केवढा उत्साह, साहस आणि दृढ निश्चय होता. कैकेयी मातेशी बोलत असताना श्रीरामप्रभू म्हणतात – **अहं हि वचनाद् राज्ञः पतेयमपि पावके। भक्षयेयं विषं तीक्ष्णं पतेयमपि चार्णवे।। (वा. रा. २। १८। २८-२९)**

**न ह्यतो धर्मचरणं किञ्चिदस्ति महत्तरम्। यथा पितरि शुश्रूषा तस्य वा वचनक्रिया।। (वा. रा. २। १९। २२)**

'महाराजांच्या सांगण्यावरून मी आगीत सुद्धा उडी घेऊ शकतो. भयंकर अशा विषाचे प्राशन करू शकतो आणि समुद्रात सुद्धा उडी घेऊ शकतो, कारण पित्याची सेवा आणि त्यांच्या आज्ञेचे पालन करणे यासारखा किंबहुना त्याहीपेक्षा अधिक कोणताही धर्म या जगात नाही.' अशाप्रकारची अनेक वाक्ये रामायणात आढळतात. त्यानंतर कौसल्या मातेला सुद्धा त्यांनी म्हटले आहे – **नास्ति शक्तिः पितुर्वाक्यं समतिक्रमितुं मम। प्रसादये त्वां शिरसा गन्तुमिच्छाम्यहं वनम्।। (वा. रा. २। २१। ३०)**

'आपण प्रसन्न व्हावे म्हणून मी आपल्या चरणांवर मस्तक ठेवून प्रार्थना करीत आहे. माझ्या ठिकाणी पितृवचन टाळण्यासाठी शक्ती नाही. म्हणून मी वनास जाण्याचीच इच्छा करतो.' याशिवाय लक्ष्मण, भरत आणि ऋषिमुनींशी बोलत असताना सुद्धा प्रभूरामचंद्रांनी पितृ-भक्तीविषयी बरेच काही सांगितले आहे. श्रीरामचंद्रांच्या बालपणाचे थोडक्यात वर्णन करत असताना देखील असेच म्हटले आहे की श्रीरामप्रभू आपल्या पित्याच्या सेवेत सदैव रत असत. 卐 卐 卐


हिंदूबोधला मन:पूर्वक शुभेच्छा!

एकनाथ पवार

संपर्क प्रमुख पश्चिम महाराष्ट्र भाजपा

पिंपरी चिंचवड महानगरपालिका



कार्यालय : ८/४, पुर्णानगर, आरटीओ ऑफीस मागे, चिखली रोड, पुर्णा नगर, चिंचवड -पुणे ४११०१९. दू. : ९९२२०२०७७७

www.eknathpawar.in / erpeknath@yahoo.co.in

eknath.bjp@gmail.com



हॉटेल भोला

शाकाहारी रेस्टॉरन्ट

ए.सी.डायनिंग हॉल

गुजराथी थाळी मिळण्याचे एकमेव ठिकाण.

स्वादिष्ट जैन पद्धतीचे जेवण सुद्धा मिळेल.

ए.सी. सुट व ए.सी. डिलक्स रूम्स्

ब्लॉक D II, प्लॉट नं. ६४, टेल्को रोड, एम्. आय. डी. सी., चिंचवड

पुणे - ४११०१९. फोन : (०२०)२७४६२८४७ मो. ८८०५०१०७७०

E-mail:hotelbhola@yahoo.co.in

## उपवास, पूजा, मूर्तिपूजा, भक्ती यांचे यथार्थ स्वरुप

पुरुषोत्तम नारायण गिरी, कार्यालय प्रमुख
वि.हिं.प. प. महाराष्ट्र, मो. ९५०३६७७३६०

'विश्व' हे एक महान रहस्य आहे आणि मनुष्य हा या विश्वातील सर्वात मोठा चमत्कार आहे. या जगात प्रत्येक मानवाची धडपड समाधान प्राप्तीसाठी आहे. पैसा, प्रतिष्ठा, सत्ता, अधिकार, ऐश्वर्य, कीर्ती, सुख यांच्या प्राप्तीमुळे आपल्याला समाधान लाभेल असे माणसाला वाटते. या सर्व गोष्टींच्या सतत मागे धावत राहिल्यामुळे क्षणिक सुख प्राप्त होत असले तरी स्थिर समाधान मात्र लाभत नाही. मग माणूस भौतिक, ऐहिक सुखाकडे पाठ फिरवून अध्यात्माकडे वळतो, मग भगवंताच्या, परेश्वर, परमात्म्याच्या प्राप्तीसाठी विविध कर्म करावयास सुरवात करतो. ज्यामध्ये प्रामुख्याने'उपवास','पूजा', 'मूर्तिपूजा','भक्ति' इत्यादि कर्म करावयास लागतो. परंतु त्याचे यथार्थ स्वरुप जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. त्याची अवस्था मग स्वामी समर्थांनी सांगितल्याप्रमाणे :– **मतामतांचा गल्बला । कोणी पुसेना कोणाला । जो जे मती सांपडला । तयास तेचि थोर ।।** होत असते. प्रस्तुत लेखात आपण 'उपवास', 'पूजा', 'मूर्तिपूजा', 'भक्ति' इत्यादिचे यथार्थ स्वरुप जाणून घेण्याचा प्रयत्न करु या.

**उपवास** : रोज आपण वरण, भात, आमटी, भाजी, पोळी यासारखे जे सात्विक भोजन करतो, ते न करता इतर तळलेले, भाजलेले, तेल, मीठ, साखरेचा जास्त वापर केलेले उपवासाचे पदार्थ अन्न म्हणून सेवन करणे, एकवेळ उपाशी राहणे किंवा दिवसभर कडकडीत उपाशी राहणे यालाच 'उपास' करणे असे समजतो. (उपास हा उपवास शब्दाचा अपभ्रंश आहे.) उपवासाचे खरे स्वरुप वेगळेच आहे.

'उप' म्हणजे समीप किंवा जवळ (उदा. कार्यकारी अभियंत्याच्या समीप असणारा उपकार्यकारी अभियंता) आणि वास म्हणजे वास्तव्य करणे किंवा रहाणे. भगवंताचे म्हणजेच परमेश्वर परमात्म्याचे यथार्थपणे तत्वदर्शन करुन देणाऱ्या सद्गुरुच्या समीप राहून त्यांचेकडून परमेश्वरास पूर्णपणे जाणणे आणि हीच जाणून घेण्याची जी क्रिया आहे किंवा कर्म आहे त्यालाच उपवास करणे असे त्याचे यथार्थ स्वरुप आहे. अशा प्रकारचा उपवास करुन देणारे सद्गुरु महत् भाग्यानेच मिळतात.

**पूजा** : एखाद्या कल्पनानिर्मित प्रतिमेला गंध, फूल, अक्षता, हळद, कुंकू वाहून नमस्कार करणे. यालाच बहूतांशी लोक पूजा करणे म्हणतात. परंतु पूजेचे यथार्थ स्वरुप काय आहे? 'पूजा' या शब्दाच्या प्रत्येक अक्षरात गहन अर्थ सामावला आहे. 'पू' म्हणजे पूर्णपणे आणि 'जा' म्हणजे जाणणे.

भगवंताला, परमेश्वराला पूर्णपणे जाणून घेणे म्हणजेच पूजा करणे. जाणून घेण्याचा कुणी प्रयत्नच करुन न घेता पुस्तकात लिहिलेले किंवा सांगितलेले विधी करण्यातच मनुष्य स्वतःला धन्य समजतो, आणि त्यामुळे चिरंतन सुख, शांती, समाधानास मुकतो. टिप :– परमेश्वराला पूर्णपणे जाणून घेण्याची 'रिती' ज्याला माहित असते त्यालाच 'पूजारी' म्हणावे.

**भक्ति** : अशाप्रकारे उपवास आणि पूजा करुन परमात्म्याला जाणून घेतल्यानंतर पुढे भक्ति करण्याचा मार्ग सुकर होत जातो. 'भक्त' म्हणजे जुळलेला आणि विभक्त म्हणजे वेगळा. विभक्ताच्या विरुद्ध म्हणजे भक्त.

**संवाद ट्रेडप्रिंटस्**
**छपाई क्षेत्रातील एक दर्जेदार सचोटीपूर्ण व्यवहार** संवाद
**बी–७, गोवईकर इमारत, शनिवार पेठ, पुणे – ३० दूरध्वनी : (०२०) २४४८५६३२**
**Email : sanwadpvt@gmail.com**

परमेश्वर, परमात्म्याला पूर्णपणे जाणून घेतल्यानंतर जाणणारा त्याच्याशी तद्रुप होऊन जातो. मग त्याला संतांनी सांगितल्याप्रमाणे जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी आहे वनमाली जेथेजेथे याची प्रचिती येते. 'हे परमेश्वरा तू आणि मी वेगवेगळे नाहीत' ही जाणीव त्याला सतत उठता-बसता, झोपता-जागता, रोजचे दैनंदिन क्रियाकर्म करीत, होत असते. मग दत्तात्रय प्रभूच्या आरतीतील ओळी प्रमाणे त्याची स्थिती होते :- **'मी तू पणाची झाली बोळवण'** किंवा **'जिकडे पहावे तिकडे तू दिसशी नयना'** संतानी सुद्धा सांगितले आहे :- **'देव पाहावयासी गेलो तेथे देवची होऊन गेलो'.**

**प्रतिमा आणि मूर्ती :** प्रतिमा आणि मूर्ती सर्वस्वी भिन्न आहेत. प्रतिमा ही काष्ट (लाकूड), पाषाण, मृत्तिका (माती), अष्टधातू वगैरेपासून बनविलेली जीव निर्मित आणि सिमीत आकृती अथवा रचना असते.

प्रतिमेचा जन्म भावनेपोटी कल्पनेद्वारा होतो. वैदिक सिद्धांतानुसार विश्वरुपाची किंवा विश्वरुप परमात्म्याची प्रतिमा नाही. स्वयंभू विश्वरुपच मूर्ती आहे. त्या चार खाणीमधील चौऱ्यांशी लाख योनीतील सर्व मूर्तीच आहे. मूर्ती ही विराट दृष्याची नैसर्गिक रचना आहे. अष्ठधाप्रकृती ही विश्वरुप परमेश्वराची प्रत्यक्ष सगुण साकार मूर्तिच आहे.

**मूर्तिपूजा :** संपूर्ण ब्रह्मांड (विश्व) हीच यथार्थ मूर्ति असल्यामुळे मूर्तिपूजा म्हणजे कोणताही भेदभाव न ठेवता सर्व भूतात (उद्बीज, स्वेदज, अण्डज आणि जारज ह्या चारही खाणींमधील सर्व चौऱ्यांशी लाख योनीमध्ये) परमेश्वर परमात्मा जाणून (मानून नव्हे) त्यांची स्वकर्माद्वारे यथोचित सेवा करणे हीच खरी मूर्तिपूजा आहे. या मूर्तिपूजेसाठी गंध, अक्षता, फूल, उदबत्ती, तांबूल, धूप, दीप, नैवेद्य वगैरेंची काहीच आवश्यकता नसून स्वतः सेवा करण्याची परम इच्छा असणे, याचीच आज खरी गरज आहे.

थोडक्यात मूर्तिपूजा म्हणजे सर्व प्राणीमात्रांची सेवा म्हणजेच विश्वसेवा. आणि विश्वसेवा म्हणजेच विश्वरुप परमत्म्याचीच सेवा. **ॐ शांती ऽ शांती ऽ शांती ऽ**

卐 卐 卐


**।। श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि, श्रीनाथनगर ।।**

**पाटेठाण, पो. राहु, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७ , हडपसर (पुणे) टेलिफॅक्स (०२०) २६९११२४२, २६९९२८९८**
**कारखाना साईट : EPABX NO. ९९२३००२९२४/८५५१८६८८९९, फॅक्स नं. ०११.४३८५०२६१**

**✻ कारखान्याची ठळक वैशिष्ट्ये ✻**

❖ पुणे जिल्ह्यातील खाजगी क्षेत्रातील पहिला साखर कारखाना. ❖ पांढ्या शुभ्र दाणेदार व निर्यातक्षम साखर /रॉ. शुगर/रॉ शुगर प्रक्रिया/ सर्व पर्याय उपलब्ध. ❖ १० मेगॅ वॅट क्षमतेचा सहविद्युत निर्मिती प्रकल्प सुरू. ❖ डिस्टीलरी प्रकल्प सुरू. ❖ सामाजिक बांधिलकी म्हणुन कारखाना अनेक उपक्रम राबवतो. ❖ कारखान्याचे ऊस पुरवठादार शेतकऱ्यांबरोबर जिव्हाळ्याचे व आपुलकीचे नाते. ❖ महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या सहकार्याने शेतकऱ्यांना मार्गदर्शन व मोफत खत वाटप. कार्यक्षेत्रातील ठिबक सिंचनसाठी कंपन्यांशी करार, योजना राबविण्याचे काम सुरू. कुटुंबातील सर्वांसाठी कारखाना साईटवर अल्पदरांत संगणक प्रशिक्षण योजना सुरू.❖ कुटुंबातील सर्वांसाठी कारखाना साईटवर अल्पदरात संगणक प्रशिक्षण योजना सुरू. ❖ कारखाना साईट व देशी गाई संगोपन केंद्र सुरू.

**ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
**उपाध्यक्ष**

**श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
**कार्याध्यक्ष व संस्थापक अध्यक्ष**

**नामदार श्री. विनोदजी श्रीधर तावडे,**
**(अध्यक्ष, कॅबिनेट मंत्री, शालेय शिक्षण, उच्च आणि तंत्र शिक्षण, मराठी भाषा आणि सांस्कृतिक कार्य इ. खाते, महाराष्ट्र राज्य**

**✻ संचालक मंडळ ✻**

**श्री. बबनराव सोपानराव गायकवाड**
**श्री. हेमंत संभाजीराव करंजे**
**श्री. अनिल लक्ष्मण बधे**
**श्री. दत्ताराम मारुती रासकर**
**(मुख्य कार्यकारी अधिकारी)**

**श्री. महेश संभाजीराव करपे**
**श्री. अनिल जयवंतराव भुजबळ**
**श्री. माधव पांडुरंग राऊत**

**श्री. योगेश दत्तात्रय ससाणे**
**श्री. पांडुरंग तुकाराम कदम**
**श्री. किसन दिनकर शिंदे**

**व प्रवर्तक मंडळ**

**माघ/फाल्गुन १९३८ पंचांग व दिनविशेष –फेब्रुवारी २०१७**

| दि. | वार | तिथि | क. मि. | नक्षत्र | क.मि | दिनविशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बुध | शु.५ | २६:२० | उ.भा. | २२:०६ | वसंत पंचमी | उत्तम दिवस |
| २ | गुरु | शु.६ | २४:४३ | रेवती | २१:११ | | उत्तम दिवस |
| ३ | शुक्र | शु.७ | २२:५० | अश्विनी | २०:०२ | रथसप्तमी | शुभ दिवस |
| ४ | शनि | शु.८ | २०.४५ | भरणी | १८:३९ | दुर्गाष्टमी | १० नं. चांगला |
| ५ | रवि | शु.९ | १८:३० | कृत्तिका | १७:०७ | | १७ प. वर्ज्य |
| ६ | सोम | शु.१० | १६:१० | रोहिणी | १५:२९ | | १५ प. चांगला |
| ७ | मंगळ | शु.११ | १३:४८ | मृग | १३:४९ | जया एकादशी | १४ प. वर्ज्य |
| ८ | बुध | शु.१२ | ११:३० | आर्द्रा | १२:१३ | प्रदोष | उत्तम दिवस |
| ९ | गुरु | शु.१३ | ०९:२२ | पुनर्वसु | १०:४८ | गुरुपुष्यामृत | उत्तम दिवस |
| १० | शुक्र | शु.१४<br>शु.१५ | ०७:३१<br>३०:०३ | पुष्य | ०९:३९ | माघस्नान | क्षयदिन वर्ज्य |
| ११ | शनि | कृ १ | २९:०५ | आश्लेषा | ०८:५४ | गुरुप्रतिपदा | चांगला दिवस |
| १२ | रवि | कृ.२ | २८:४२ | मघा | ०८:३९ | | चांगला दिवस |
| १३ | सोम | कृ.३ | २८:५७ | पूर्वा | ०८:५९ | | १७ प. चांगला |
| १४ | मंगळ | कृ.४ | २९:५२ | उत्तरा | ०९:५७ | अंगारक चतुर्थी | उत्तम दिवस |
| १५ | बुध | कृ.५ | अहोरात्र | हस्त | ११:३२ | | सामान्य दिवस |
| १६ | गुरु | कृ.५ | ०७:२४ | चित्रा | १३:४१ | | उत्तम दिवस |
| १७ | शुक्र | कृ.६ | ०९:२६ | स्वाती | १६:१८ | | ९ नं. वर्ज्य |
| १८ | शनि | कृ.७ | ११:४८ | विशाखा | १९:१० | कालाष्टमी | ११ प. अनिष्ट |
| १९ | रवि | कृ.८ | १४:१८ | अनुराधा | २२:०६ | छ. शिवाजी महाराज जयंती | चांगला दिवस |
| २० | सोम | कृ.९ | १६:४२ | ज्येष्ठा | २४:५३ | श्रीरामदासनवमी | अनिष्ट दिवस |
| २१ | मंगळ | कृ.१० | १८:४६ | मूळ | २७:१७ | | ११ प. प्रतिकुल |
| २२ | बुध | कृ.११ | २०:२० | पू.षा. | २९:११ | विजया एकादशी | चांगला दिवस |
| २३ | गुरु | कृ.१२ | २१:१९ | उ.षा. | ३०:३० | | अशुभ दिवस |
| २४ | शुक्र | कृ.१३ | २१:३९ | श्रवण | अहोरात्र | प्रदोष | प्रतिकुल दिवस |
| २५ | शनि | कृ.१४ | २१:२१ | श्रवण | ०७:११ | | वर्ज्य दिवस |
| २६ | रवि | कृ.३० | २०:२८ | धनिष्ठा<br>शततारा | ०७:१६<br>३०:४९ | दर्श अमावस्या | अशुभ दिवस |
| २७ | सोम | शु.१ | १९:०६ | पू.भा. | २९:५७ | | चांगला दिवस |
| २८ | मंगळ | शु.२ | १७:२१ | उ.भा. | २८:४३ | मु.जमदिलाखर मासारंभ | उत्तम दिवस |

## संधी समाजसेवेची : सेवाकार्य प्रशिक्षण वर्ग

**सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे संतु निरामयाः ।**
**सर्वे भद्राणि प्रश्यन्तु मा कश्चित दुःख भाग् भवेत ।।**

अशी कामना करुन विश्व हिंदू परिषद निस्वार्थ आणि कर्तव्य भावनेने सेवा कार्य करते आहे. सेवेच्या माध्यमातून भारतीय समाज आत्मनिर्भर, स्वाभिमानी, अनिष्ठ रुढी परंपरांनी मुक्त व राष्ट्रभक्त करण्याचा प्रयत्न परिषद करत आहे. सुशिक्षित, स्वस्थ, सुसंपन्न, सुरक्षित तथा समानता समरसतायुक्त समाज निर्माण करणे या हेतूने देशभर ६० हजारापेक्षा अधिक सेवा कार्य, आरोग्य, शिक्षण, संस्कार, रोजगार, पर्यावरण रक्षण, धर्मजागृती या क्षेत्रात परिषद चालवित आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये सेवा परमो धर्म : म्हटल आहे. एखाद्या दुःखी, असाहय्य व्यक्ती व समूहगटाला आपल्या हातून काही मदत झाली तर त्या असहाय व्यक्तिच्या चेहग्र्यावरचा आनंद पाहून जीवनाचे सार्थक झाल्याचा भाव निस्पृह व्यक्तिंच्या मनात निर्माण होतो.

बंधू भगिनिंनो अशा सेवा कार्यात सहभागी होण्याची आपणास नम्र विनंती करीत आहोत. आपण सेवानिवृत्त झाला असाल तर अधिक वेळ देऊ शकाल. तसेच आपल्या ज्ञानाचा अनुभवाचा खूप फायदा या सेवा कार्यांना होऊ शकतो.

आपल्या पश्चिम महाराष्ट्रात चालणाग्र्या सेवाकार्यांची माहिती देण्यासाठी व सेवाकार्य कशी करावीत? कोठे करावीत व त्याव्दारे आत्मानंद कसा मिळवावा याचे मार्गदर्शन करण्यासाठी दि. २५ व २६ फेब्रुवारी २०१७ रोजी शिक्रापूर येथील सेवा प्रकल्पावर अभ्यासवर्ग आयोजित केला आहे. आपण या अभ्यास वर्गास यावे ही नम्र विनंती. तसेच याआधी अभ्यास वर्गाच्या नियोजनासाठी वेळ दिल्यास अधिक लाभदायक ठरेल.

**संजय मुरदाळे : प्रांत सेवा कार्य प्रमुख ७५८८९५४६४६**

**श्रध्दांजली :** १) अभिजित सिध्देश्वर कुलकर्णी उर्फ राजू २०.१२.१६ देहावसान हृद्यविकाराने पुणे महानगराचे द. भागाचे माजी मंत्री २) श्री कुमुद उर्फ जयश्री दिपक बापट २७.१२.१६ ला दिर्घकालीन आजाराने निधन झाले. त्यांच्या दुःखात विहिंप. सहभागी आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही श्रीरामचरणी प्रार्थना **संपादक हिंदूबोध**

आता आपली बाहेरील ज्यादा व्याजदराची
कर्ज खाती स्वस्त दराच्या कर्जात
बदलण्याची वेळ झाली !



## उत्सव कर्ज योजना 2016

**येणारा आपला प्रत्येक सण आनंदात साजरा करा.**

आपण वाट पाहत असलेली जनता बँकेची *उत्सव कर्ज योजना 2016* सुरु.
₹ 5 लाखापर्यंतची कर्जे सहज उपलब्ध.

**व्याजदर देखील आकर्षक**
- तारणी कर्ज 12.50 %
- विनातारणी कर्ज 14.50 %

अन्य अटी व शर्ती अत्यंत सोप्या.



*छोट्या लोकांची...*
*मोठी बँक...!*

## कॅश क्रेडिट कर्ज योजना

**व्यापारी समुदायाला आता अधिक बरकत होणार !**

**उशीर नको, त्वरीत निर्णय घ्या.** कारण जनता बँकेने आणली आहे...

- केवळ 13% व्याजदराची कॅश क्रेडिट कर्ज योजना

आजच नजिकच्या शाखेला भेट द्या.

अन्य अटी व शर्ती अत्यंत सोप्या.



आमच्या सर्व शाखांमध्ये
आपले स्वागत आहे !

सतीश गंधे
व्यवस्थापकीय संचालक

किशोर देशपांडे
अध्यक्ष
व संचालक मंडळ

प्रा. गजानन धरणे
उपाध्यक्ष

SJSB
Multi-State Scheduled Coop.Bank

# सोलापूर जनता सहकारी बँक लि.
# Solapur Janata Sahakari Bank Ltd.

मल्टी-स्टेट शेड्युल्ड को-ऑप. बँक Multi-State Scheduled Coop.Bank

मुख्य कार्यालय Head Office
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, 'Gaganbharari' Shivsmarak Sankul, Goldfinch Peth, सोलापूर Solapur 413 007 फोन क्र. Ph. No. : 0217- 274 1100 ते to 06
Visit us : www. sjsbbank.com

वार्षिक वर्गणी रु. १००/- फक्त
Posted & Published on 28th Previous of each month
Posted at Marketyard P.S.O. Pune.

RNI No. MAH MAR / 2001 / 5979
Registration No. PCW / 077 / 2015-17
License to pay without prepayment of postage No. WPP-114




## हिंदूबोध वर्गणीदारांना आवाहन

हिंदूबोध मासिकाचे सभासद वाढावे म्हणून व वर्गणीचे स्मरण रहावे यासाठी, वर्गणी संपलेल्या सभासदांनाही हा अंक व पुढील अंक कायम पाठविण्याची योजना आहे. या योजनेला प्रतिसाद देऊन कृपया योग्य ती वर्गणी पाठविण्याची व्यवस्था करावी. आपले मित्र, आप्त, कार्यकर्ते यांना आग्रहाने सभासद करुन घरोघरी 'हिंदूबोध' मासिकाचे सभासद करावेत. हिंदुत्वाचा तेजस्वी विचार प्रत्येक हिंदू कुटुंबात जाण्यासाठी सहकार्य करावे. वर्गणी शक्यतो आजीवन पाठवावी. वर्गणी व जाहिरातीचे दरपत्रक अंकात दिलेले आहे. सभासदाने कमीत कमी १०० नवीन सभासदांचे पत्ते व वर्गणी पाठवून या कार्यास हातभार लावावा.

**हिंदूबोधची वर्गणी, जनता सहकारी बँक लि., शनिवार-नारायण शाखा, पुणे ४११०३०**

**खाते क्र. 015220100024473**
**IFSC Code : JSBP0000015**
**येथे भरून, हिंदूबोध व्यवस्थापक यांना ०२०-२४४७१७०१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

धन्यवाद
**- संपादक**

# हिंदूबोध

द्वारा : संपादक - विवेक प्रभाकर सिन्नरकर, ९३७१००३७४८
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : २४४७१७०१